वृषाली जोशी

# कहाणी दोन शहरांची

# A Tale of Two Cities

CHARLES DICKENS

# A Tale Of Two Cities

# कहाणी दोन शहरांची

## लेखक- Charles Dickens (चार्ल्स डिकन्स)

## मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

# A Tale Of Two Cities

# कहाणी दोन शहरांची

लेखक - Charles Dickens (चार्ल्स डिकन्स)

अनुवादक: डॉ. वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : ३० डिसेंबर २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# A Tale Of Two Cities

# कहाणी दोन शहरांची

## Charles Dickens

## चार्ल्स डिकन्स



# प्रकरण १

# चमत्कारिक निरोप



Dreams of Digging a Man out of a Grave

ते १७७५ हे ते १७७५ हे वर्ष होते आणि फ्रान्स व इंग्लंड दोन्ही क्रांतीच्या काठावर उभे होते.इंग्लंडचा राजा तिसरा जॉर्ज अमेरिकन वसाहती व रयतेची गरिबी, या त्याच्या देशाच्या समस्या सोडवण्यात, पूर्णपणे गुरफटलेला होता. फ्रान्सचा राजा सोळावा लुई व त्याच्या दरबारातील उमराव यांना स्वतःच्या चैनीची व संपत्तीची जास्त फिकीर पडली होती. तळागाळातले गरीब, उपाशी लोक त्यांच्या राज्यकर्त्यांचे बेत धुळीस मिळवायला निघाले होते. तेव्हा लंडन व पॅरीस या दोन देशांच्या राजधान्या अस्वस्थ होत्या. क्रांतीचे वारे वाहू लागले होते.

या काळात इंग्लंडमध्ये खूप गुन्हे घडत होते. नोव्हेंबरमधील शुक्रवारच्या एका रात्री उशीरा लंडनमध्ये जेव्हा मागील बाजूने एका घोड्याच्या भरधाव टापांचा आवाज कानावर आला, तेव्हा घोडागाडीतील उतारू सुरक्षिततेच्या कारणासाठी, घाबरून गेले. घोड्यावरील स्वार जरबेच्या आवाजात ओरडला, “थांबा. नाहीतर मी गोळी घालेन.”

तो खाली उतरून, म्हणाला, “मला या गाडीतील डोव्हरला जाणाऱ्या एका उतारुशी बोलायचे आहे. त्याने हाक मारली, “मिस्टर जर्व्हीस लॉरी.”

साधारण साठीचा एक माणूस थरथर कापत बोलला, “मी इथे आहे. कोणाचे काय काम आहे?”

घोडेस्वार म्हणाला, “मी जेरी क्रंचर आहे. मी टेलसन्समधून एक निरोप आणला आहे.”

त्याने उतारूकडे वळून विचारले, “तुमच्यापैकी कोण मिस्टर जर्व्हीस लॉरी आहे?”

मिस्टर लॉरी म्हणाले, “ठीक आहे, मला निरोप पाठवणारा माहिती आहे. मी लंडनमधील टेलसन्स बँकेसाठी काम करतो आणि तोदेखील तिथेच काम करतो.”

घोडेस्वाराने गाडीत दिलेला कागद मिस्टर लॉरीने घेतला. त्याने तो उघडून, स्वतःशीच वाचला. ‘डोव्हरला मॅडमसाठी थांबा.’ मग त्याने घोडेस्वाराकडे वळून म्हटले, “जेरी, माझे उत्तर आहे, ‘पुनर्जिवित झालेला.’”

घोडेस्वार परत घोड्यावर मांड टाकत पुटपुटला, “हे खूपच विचित्र उत्तर आहे.

मध्यंतरीच्या काळात मिस्टर लॉरी इतर उतारूप्रमाणेच डुलकी घेऊ लागले. पण त्यांची झोप इतरांसारखी विश्रांती देणारी नव्हती, कारण त्याना अशी स्वप्ने पडत होती, की ते स्मशानात खणून एका माणसाला बाहेर काढत आहेत.

परतपरत जर्व्हीस लॉरी भुताला विचारत होता, “तुम्ही किती वर्षे इथे पुरलेले होतात?”

भूत परतपरत तेच उत्तर देत होते, “जवळजवळ अठरा वर्षे.”

“तुम्हाला माहिती आहे का, की तुम्हाला पुनरुज्जीवित करण्यात येत आहे?”

“त्यांनी मला तसे सांगितले.”

जेव्हा हे संभाषण इतर उतारूंना उठवण्याइतके मोठ्याने झाले, तेव्हा त्यानी ते मिस्टर लॉरीच्या लक्षात आणून दिले व त्यांना उठवले. रात्रीच्या काळोखात मिस्टर लॉरीने इतर दोन उतारूंना गाडीतून उतरून, रस्त्याने जातांना पाहिले.

सकाळ होतांना गाडी डोव्हरला पोचली. इंग्लिश खाडी ओलांडून कॅले, फ्रान्सला जाण्याची ती बोटी सुटण्याची जागा होती. मिस्टर लॉरीने डोव्हरला रॉयल जॉर्ज खानावळीत एक खोली आरक्षित केली, कारण बोट दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत सुटणार नव्हती. नंतर त्याने खानावळीच्या मालकाला सांगितले, "कृपया आज इथे येणाऱ्या एका तरूण बाईकरता दुसरी खोली तयार करा. ती टेलसन्स बँकेच्या मिस्टर लॉरीसाठी चौकशी करेल."

खानावळीच्या मालक बोलला, "तुम्ही टेलसन्स बँकेतील सभ्य गृहस्थ असून, बरेच वेळा प्रवास करता, नाही का?"

मिस्टर लॉरीने स्पष्ट केले, "हो आमची कार्यालये दोन्हीकडे इंग्लंड आणि फ्रान्समध्ये आहेत. पण गेल्या पंधरा वर्षात मी काही प्रवास केलेला नाही."

त्या दिवशी संध्याकाळी मिस्टर लॉरीचे जेवण झाल्यावर वेटरने त्यांना सांगितले, की मिस मॅनेट आलेली आहे.

जेवणाच्या शेवटचा गोड पदार्थ टाकून, मिस्टर लॉरी घाईने वर गेले. ल्युसी मॅनेटच्या हॉलमध्ये शिरून, त्यांनी सतरा वर्षांचीदेखील नसलेली ती तरुणी पाहिली. ती बुटकी, बारीक व सुंदर मुलगी होती. तिचे केस लांब व सोनेरी

होते. तिचे गडद निळे डोळे मिस्टर लॉरी यांच्या नजरेशी प्रश्नार्थकपणे भिडले. पंधरा वर्षांपूर्वी, फ्रान्सपासून इंग्लंडपर्यंत खाडीने प्रवास करतांना, त्यांनी तिला लहानशा बाळासारखे हातात धरल्याचे त्यांना आठवले. त्याना माहिती होते, की तीच ती मुलगी आहे. पण ल्युसीने अर्थातच त्यांना ओळखले नाही.

मिस्टर लॉरी अदबीने पुढे झुकून म्हणाले, “मिस मॅनेट, तुम्हाला भेटून आनंद झाला.”

त्या तरुणीने त्याना खुर्चीवर स्थानापन्न केले आणि सरळ कामाला लागली.

“सर, मला काल टेलसन्स बँकेकडून पत्र मिळाले. त्यातून मला एका शोधाबद्दल माहिती मिळाली --- जे अनेक वर्षांपूर्वी वारले, त्या माझ्या गरीब बिचाऱ्या वडीलांच्या मालमत्तेबद्दलची ती माहिती होती --- मला वाटते, ती मालमत्ता फ्रान्समध्ये आहे...”

तिचा आवाज गदगदला व डोळयातून वाहणारे अश्रू तिने पुसले.

आणि परत बोलायचा प्रयत्न करू लागली. पत्रात असे होते, की मी पॅरीसला जावे व बँक तिकडे पाठवणार असलेल्या माणसाला भेटावे.

“तो माणूस मीच आहे.”

त्याने आधीच लंडन सोडल्याने, त्या माणसाला डोव्हरला माझ्यासाठी थांबण्याचा निरोप पाठवण्यात आला. बँकेने मला सांगितले, की मालमत्तेबाबत सर्व माहिती तेच गृहस्थ मला देतील. त्यापैकी काही मला नक्कीच नवलपूर्ण वाटेल. अर्थात ती काय आहे, याची मला उत्सुकता आहे.”

मिस्टर लॉरीने त्यांचा डोक्याचा विग नीट बसवत, उदासीनतेने म्हटले, “साहजिक आहे.” शेवटी त्या तरूण स्त्रीकडे सरळ बघून त्यांनी गोष्ट सांगायला सुरवात केली.

“मी प्रथम तुम्हाला आमच्या बँकेच्या एका ग्राहकाविषयी सांगतो --- खूप बुद्धिमान असा फ्रेंच माणूस, डॉक्टर --- त्याने एका इंग्लिश बाईशी लग्न केले होते. त्यावेळी म्हणजे वीस वर्षांपूर्वी पॅरीसमधील टेलसन्स बँकेत, त्याची सेवा करायची आनंददायक संधी मला मिळाली.”

“म्हणजे सर, तुम्ही मला माझ्या वडिलांची गोष्ट सांगत आहात” --- ती थांबली. तिच्या कपाळावर भीतीने आठ्या पडल्या होत्या. नंतर तिच्या चेहऱ्यावर पुसट स्मित झळकले. “ही गोष्ट तुम्हाला माहिती आहे, कारण वडील वारल्यावर दोन वर्षांनी, माझी आई वारली, तेव्हा तुम्ही मला इंग्लंडला आणलेत.”

मिस्टर लॉरीने ल्युसीचा हात धरून, तो हळूवारपणे त्यांच्या ओठांशी आणला व तो बोलला, “हो, मुली, तो मीच होतो. जरी सहसा मी व्यक्तीगत भावना व्यवसायापासून दूर ठेवत असलो, तरी तुमच्या वडिलांशी माझे जवळचे व्यावसायिक संबंध होते ...”

मिस्टर लॉरींनी उदासीनतेने त्यांचा केसांचा टोप परत सारखा केला. मग परत ते गोष्टीकडे वळले. “हो, ही तुझ्या वडिलांची गोष्ट आहे. मात्र आता त्यात फरक आहे. तर ते तेव्हा वारले नव्हते, तर फक्त अचानक एकाएकी, शक्तीमान

शत्रूमार्फत नाहीसे झाले होते. त्या शत्रूंनी एका कागदावर असे लिहून घेतले होते, की आम्ही तुम्हाला कितीही वर्षे तुरुंगवासाची शिक्षा देऊ शकतो --- “

ल्युसी आश्चर्यचकित झाली. तिने मिस्टर लॉरींचा दंड पकडून ठेवला.

“ --- जर त्या सभ्य गृहस्थाच्या बायकोने राजाकडे तिच्या नवऱ्याचा ठावठिकाणा समजण्यासाठी याचना करूनही, तिला काही उत्तर कधीच मिळाले नसेल आणि त्यापुढे म्हणजे, नवरा नाहीसा झाल्याने तिला मुलीला जन्म देण्यापूर्वी इतका त्रास झाला असेल, तर --- “

ल्युसीने मागणी केली, “हो, हो, तर पुढे काय झाले?”

“जर आईचा त्रास इतका जास्त असेल, तर तिने असे ठरवले असणार, की तुझे वडील मेले, असे सांगूनच मुलीला वाढवलेले बरे --- “

ल्युसी मॅनेट तिच्या खुर्चीतून उडी मारत उठली आणि मिस्टर लॉरीचे पाय पकडून रडत व उठून त्याची त्याची मनगटे धरत म्हणाली, “सर, कृपया मला सर्व काही सांगा!”

“मिस मॅनेट, तुम्ही स्वतःला आवरा.”

तिला हळूवारपणे जमिनीवरून उठवत, मिस्टर लॉरी पुढे सांगू लागले. “जरी तुझ्या आईने तुझ्या वडीलांचा शोध घेणे कधीच थांबवले नाही, तरी तुम्ही दोन वर्षाच्या असतानाच त्या हृदयाचा धक्का बसून वारल्या. तुमच्या पालकांकडे फार मालमत्ता नव्हती. आम्हाला काही नवीन पैसे किंवा मालमत्ता सापडली नाही. पण --- “

ल्युसीने तोंडाचा आ वासून, त्यांच्या मनगटावरील पकड घट्ट करत विचारले, “पण काय?”

मिस्टर लॉरीने एक खोल श्वास घेतला. “तुमचे वडील सापडले आहेत. अलेक्झांडर मॅनेट जिवंत आहेत, पण ते इतके बदलले आहेत, की त्यांना कोणीच ओळखणार नाही. ते त्या फ्रेंच तुरुंगातून सुटले आहेत आणि पॅरीसमधील एका एकनिष्ठ व विश्वासू सेवकाकडे त्यांना नेले आहे. आता उद्या आपण तिकडे जातो आहोत ---

मी त्याना ओळखू शकलो, तर ओळखण्यासाठी आणि तुम्ही त्याना आराम देऊन, पुन्हा ताळ्यावर आणून सशक्त करण्यासाठी.”

ती तरूण स्त्री थरथर कापू लागली. ती गुंगीत असल्यासारखी बोलली, “मी त्यांना नव्हे तर त्यांच्या भुताला पाहणार आहे. त्यांच्या भुताने मला कधी झपाटलेले नाही. आता त्यांना बघणे --- पूर्वी कधीच बघितलेले नसतांना --- व ते माझे वडील आहेत हे माहिती असतांना की ते पूर्णपणे मोडून पडले आहेत”

मिस्टर लॉरी मध्येच बोलले, “अजून एक गोष्ट तुम्ही जाणून घ्या. ते वेगळ्या नावाने सापडले आहेत. त्याबद्दल काही प्रश्न विचारू नका. कारण फ्रान्समध्ये ते धोकादायक ठरेल. ज्या लोकांनी तुमच्या वडिलांना तुरुंगात टाकले, ते तिथे अजून राज्य करत आहेत आणि मी एक इंग्लिश माणूस व महत्वाच्या बँकेचे प्रतिनिधित्व करणारा असूनही, काही बोलायचे वा माझ्याजवळील त्यासंबंधीचे कागदपत्र दाखवण्याचे धाडस करणार नाही. मी

अलेक्झांडर मॅनेटच्या तुरुंगातील सुटकेसाठी फक्त परवलीचे शब्द बोलणार 'पुनरुज्जिवित झालेला'.

ल्युसी मॅनेटने काही उत्तर दिले नाही. अगदी शांत व स्तब्ध बसून, तिचे डोळे बर्फासारखे गार पडले होते व सताड उघडे होते. तिला चक्कर आली होती!

अजूनही ल्युसीने त्यांचा हात घट्ट धरलेला असल्याने, जर्व्हीस लॉरी हलायला घाबरत होता. त्याने ओरडून मदत मागितली. एक लाल केसांची रानटी दिसणारी बाई शेजारच्या खोलीतून धावत आली. मिस्टर लॉरींचे जाकीट ओढत, तिने त्यांना खुर्चीतून उठवले आणि खोलीमधून धावत बाहेर काढले. नंतर मदतीच्या हाका ऐकून लगेच खानावळीचे नोकर आले. बाईने त्यांना प्यायला थंड पाणी व वास घ्यायला कांदा आणायला पिटाळले.

ल्युसीला सोफ्यावर ठेवल्यावर आणि हळूवारपणे तिचे डोके चोळल्यावर, ती जर्व्हीस लॉरीकडे वळून ओरडली, "तुम्हाला तिला जे सांगायचे होते, ते तिला इतके मरणंतिक न घाबरवता, सांगता आले नसते का? ही ल्युसीला लहानपणापासून सांभाळणारी मिस प्रॉस होती आणि ती तिच्याबरोबर लंडन ते पॅरीस असा प्रवास करून आली होती. जर्व्हीस लॉरीला खूप लाज वाटली. ल्युसी शुद्धीवर आल्याचे बघून तो घाईने खोलीबाहेर गेला.

# प्रकरण २

# पुनरुज्जीवन



Watching Hungry Peasants Lick Up the Wine

सेंट अँटोनी हा पॅरीसचा गरीब मोहल्ला होता. तिथे इतकी मोडकीतोडकी घरे होती, की तेथील लोक त्यांचा बराचसा वेळ रस्त्यावर घालवत असत. सेंट अँटोनी हा भाग भुकेने कळवळणाऱ्या लोकांनी भरलेला होता. त्यामुळे पॅरीसच्या उमराव आणि श्रीमंत वर्गाबद्दल त्यांच्या मनात द्वेष होता. ती श्रीमंत मंडळी या गरिबांच्या दुर्दैवाची जराही पर्वा करत नसत. त्यामुळे सेंट अँटोनी हा भाग झपाट्याने अस्वस्थतेचे केंद्र बनला होता --- अशी अस्वस्थता की जिचा फ्रेंच क्रांतीमध्ये लवकरच स्फोट होणार होता.

तो सेंट अँटोनीमधील एक अरुंद रस्ता होता. एक दिवस तिथे गाडीतील एका मोठ्या पिपातून, वाइनच्या दुकानाबाहेरील वेड्यावाकड्या दगडांवर वाइन सांडली. रस्त्यावरील सर्व लोक थांबले आणि धावत जाऊन, ती वाइन पिऊ लागले. काहीजण गुडघ्यात वाकले व हातांची ओंजळ करून, त्याना मिळणारा प्रत्येक थेंब मिटक्या मारत पिऊ लागले. इतरांनी दगडावरील वाइन चाटायला सुरवात केली. मुलांनी मातीच्या भिंती करून वाइनची तळी तयार केली. व चिखल आणि वाइनचे मिश्रण पिऊ लागले.

वाइनचे डाग रस्त्यावर पडून, ते रक्ताच्या रंगाचे दिसू लागले आणि लवकरच या रस्त्यावरून रक्त वहाणार होते.

वाइनच्या दुकानाचा मालक भयंकर दिसणार आणि गडद रंगाच्या केसांचा तिशीचा माणूस रस्त्यावरील चिखल मिसळलेली वाइन पिण्याचा वेडेपणा बघत उभा होता.

अर्नेस्ट दफार्ज दुर्लक्ष करत पुटपुटला, "मला काही समस्या नाही आहे. बाजारातील लोकांना दुसरे पिप आणू दे. ही त्यांची चूक आहे." एवढे बोलून, वळून तो त्याच्या दुकानात शिरला. जेव्हा तो आत शिरला, तेव्हा त्याच्या बायकोने, थेरेस दफार्जने गल्ल्याच्या मागे असलेल्या तिच्या बसायच्या जागेवरून, वर वाइनच्या दुकानाकडे पाहीले. जरी तिचे हात विणकामात गर्क असले, तरी तिच्या भुवया उंचावणे व थोडीशी मान हलवणे, यावरून तिने नवऱ्याचे लक्ष कोपऱ्यात वाइनचे घुटके घेत बसलेल्या तरुण स्त्रीकडे व वयाने मोठ्या गृहस्थाकडे बघण्यासाठी वेधले.

जर्व्हीस लॉरी आणि ल्युसी मॅनेटने अर्नेस्ट दफार्जला दुकानात शिरतांना पाहिले आणि त्याच्या मान हलवण्याने, मिस्टर लॉरी ल्युसीला म्हणाले,

"हा आपला माणूस आहे."

अर्नेस्ट दफार्जने त्यांना न बघितल्याचे ढोंग केले व तो गल्ल्यामागे जाऊन एका गिऱ्हाईकाकडे लक्ष देऊ लागला.

मॅडम दफार्ज विणकामातील एकही टाका न चुकवता, खोकली व भुवया अजून उंचावल्या.

दुकानातून गिऱ्हाईक बाहेर पडल्याबरोबर मिस्टर लॉरी गल्ल्याशी गेले आणि मिस्टर दफार्जशी हळूवारपणे बोलले. त्यांची थोडी कुजबुज झाल्यावर, दफार्जने मान हलवली आणि त्यांना दाराकडे घेऊन गेला. मिस्टर लॉरीने ल्युसीला त्यांच्या मागोमाग दुकानाबाहेर यायला सांगितले.

जरी मॅडम दफार्जने तिचे विणणे चालू ठेवले असले, तरी तिचे डोळे नवऱ्याचा व त्याच्या दोन पाहुण्यांचा वेध घेत होते.

दफार्जने मिस्टर लॉरी व ल्युसीला कचरा भरलेल्या अंधाऱ्या अंगणातून, एका अरुंद, वारा असलेल्या व फरशा बसवलेल्या जिन्याकडे नेले. त्या जिन्याभोवती पडझड झालेल्या गचाळ इमारती उभ्या होत्या.

मिस्टर लॉरी कुजबुजत बोलले, “ते एकटेच आहेत का?”

दफार्जने फटकारले, “अर्थात. ते नेहमी एकटेच असतात आणि मला जेव्हा त्यांच्या मित्रांनी विचारले, की मी कुणाशीही याबद्दल चकार शब्द न बोलता, त्याना माझ्याकडे ठेवायचा धोका घेऊ शकतो का, तेव्हा ते ज्या अवस्थेत होते, तशाच अवस्थेत ते आजही आहेत. नेहमी ते त्याच अवस्थेत असतात.”

ते जिना चढून एका बंद दाराशी आले, तेव्हा दफार्जने भोकात किल्ली घातली.

मिस्टर लॉरी ल्युसीकडे वळले व तिच्या कंबरेला विळखा घालत, आधार देत बोलले, “ये, मुली आपण तुझ्या वडिलांकडे जात आहोत.

तिचे गुडघे लटपटायला लागले ती रडत म्हणाली, “मला माझ्या वडिलांना भेटायची भीती वाटते आहे!”

# प्रकरण ३

# चांभार



Lifting the Long Golden Hair

एका इमारतीच्या छपराखालील ती खोली लहानशी व अंधारी होती. एक पांढऱ्या केसांचा माणूस तिथे एका बुटक्या बाकावर बसून,  दाराकडे पाठ करून,  खोलीतील एकुलत्या एक खिडकीकडे तोंड करून,  तो बनवत असलेल्या बुटांच्या जोडीकडे मेल्यासारखा वाकून बघत बसला होता.

मिस्टर दफार्ज खिडकीकडे जात म्हणाले, “शुभ दिवस. मला दिसते की कडे तोंड करूनकरून, खोलीतील एकुलत्या एक खिड, तो बनवत आहे, की तुम्ही अजूनही खूप श्रम घेत आहात.”

पांढरे डोके क्षणभर वर झाले. पण दाराकडे वळले नाही. एक दया येईल असा अशक्त आवाज बोलला, “हो, मी काम करतो आहे.”

एक अर्धवट बनवलेला बूट, चामड्यांचे तुकडे व काही साधी हत्यारे, त्या म्हाताऱ्याच्या समोरील बाकावर होती.

त्याच्याबरोबर खिडकीशी येऊन उभ्या राहिलेल्या मिस्टर लॉरीसमवेत, दफार्ज बोलला, “तुम्हाला भेटायला कुणी आले आहे.” ल्युसी दारातून निघत होती पण अजून चांभाराच्या दृष्टीक्षेपात आली नव्हती.

चांभाराने वळून शून्यवत दृष्टीने मिस्टर लॉरीकडे पाहीले. म्हाताऱ्याचे तेजस्वी डोळे त्याच्या खोलगट चेहऱ्यावर, उठून दिसत होते. त्याचे चिंध्या

झालेले पांढरे केस व दाढी त्याच्या काळ्या भुवयांवर उठून दिसत होती. वयाप्रमाणे त्याचा शर्ट पिवळा पडून, त्याच्या चिंध्या झाल्या होत्या. त्याच्या इतर शरीराप्रमाणेच दारातील उजेड टाळण्यासाठी उंचावलेला त्याचा हात सुकलेला होता.

त्याला टोचून बोलत, दफार्ज म्हणाला, "या माणसाला विचारा, की तुम्ही कुठल्या प्रकारचे बूट बनवत आहात?

बऱ्याच वेळाने म्हातारा माणूस उत्तरला, "हा बाईचा बूट आहे. तरुण बाईचा चालायचा बूट आहे."

"आणि चांभाराचे नाव काय आहे?"

"माझे नाव? एकशे पाच, उत्तर मनोरा." एवढेच तो चांभार बोलला. मग तो वाकून परत त्याच्या कामाला लागला.

शांतताभंग करत, मिस्टर लॉरीने विचारले, " डॉ मॅनेट, तुम्हाला मी आठवत नाही का?"

चांभार परत वळला व पाहुण्याकडे रोखून बघत राहीला. अर्धवट तयार झालेला बूट त्याच्या हातून जमिनीवर पडला.

मिस्टर लॉरीने दफार्जकडे बोट दाखवत विचारले, "तुम्ही यालाही ओळखत नाही का? मी तुमच्या बँकेचा माणूस होतो आणि तो तुमचा विश्वासू नोकर होता. तुम्हाला ते आठवत नाही का?"

म्हाताऱ्या माणसाने रिकाम्या डोळ्यांनी मिस्टर लॉरी व दफार्जकडे रोखून पाहीले. त्यांच्या डोळ्यात चमक आलेली दिसली. पण परत ते गढूळले.

एक खोल सुस्कारा टाकून डॉ मॅनेट परत त्यांच्या बूट बनवायच्या कामाला लागले.

मध्यंतरीच्या काळात ल्युसी भिंतीला धरून, म्हातारा पूर्ण दिसेपर्यंत चालत आली. तिला पहिल्यांदा वाटणारी भीती दुःखात व दयेत बदलली --- आणि प्रेमात. ती हळूवारपणे तिच्या वडिलांच्या बाजूला वळली.

डॉ मॅनेटने तिला पाहीले नाही. त्याने हातातील हत्यारे खाली ठेवली व व चांभाराचा चाकू हातात घेतला. त्याने असे करताच, त्याने ल्युसीचा स्कर्ट बघितला. त्याने तिचा चेहरा दिसेपर्यंत डोके वर केले. मिस्टर लॉरी आणि मिस्टर दफार्ज जणू काही ल्युसीला म्हाताऱ्याच्या हातातील चाकूपासून वाचवण्यासाठी एक पाऊल पुढे सरकले. पण तिने त्यांना मागे ढकलले.

कधी न ऐकलेल्या आवाजात, चांभाराने अवाक होत विचारले, “हे काय आहे?”

काही उत्तर न देता ल्युसीने तिचे हात तिच्या ओठांवर ठेवले व आणि नंतर त्या हातांनी त्याचे चुंबन घेतले. तिच्या डोळयातून अश्रू वाहू लागले.

म्हाताऱ्या चांभाराने विचारले, “तू जेलरची मुलगी आहेस का? ल्युसी कुजबुजली, “नाही.”

त्या माणसाने अशक्तपणे विचारले, “मग तू कोण आहेस?”

बोलण्यासाठी अजून ल्युसीचा स्वतःवर विश्वास नव्हता. पण ती त्यांच्यासमोर खाली बाकावर बसली आणि त्यांच्या दंडावर तिचा हात ठेवला.

म्हाताऱ्या माणसाच्या कृश शरीरावरून एक थरथर जाणवून गेली आणि तो मागे झाला. पण त्याने चाकू खाली ठेवला आणि सावकाशीने मुलीच्या लांब सोनेरी केसांच्या काही बटा हलकेच त्याच्या हडकलेल्या बोटांमध्ये धरल्या. नंतर त्या परत हळूवारपणे ल्युसीच्या खांद्यावर टाकत, त्याने त्याच्या मानेभोवतालची दुमडलेली एक चिंधी काळजीपूर्वक उघडली. त्यात अनेक लांब सोनेरी केसांच्या बटा होत्या.

पुन्हा ल्युसीचे केस उचलून, व त्याकडे बारकाईने बघत, म्हातारा माणूस आश्चर्यचकित झाला. “हे अगदी सारखे आहेत. असे कसे शक्य आहे? हे कधीचे आहेत बरे?”

मग त्याने मुलीचा चेहरा पूर्णपणे प्रकाशाकडे वळवला आणि शब्द बाहेर आले.

“मला चांगले आठवते आहे --- खूप पूर्वी, त्या रात्री जेव्हा मला घराबाहेर बोलावले गेले, तेव्हा तिने तिचे डोके माझ्या खांद्यावर ठेवले. मी जाणार म्हणून ती घाबरत होती. मग जेव्हा मला माझ्या उत्तर मनोऱ्यातील, तुरुंगाच्या खोलीत आणले गेले, तेव्हा आता जिथे माझ्या मुलीने हात ठेवला आहे, तिथे ते केस माझ्या शर्टाच्या बाहीवर सापडले. जेलरने मला ते ठेवायची परवानगी दिली. कारण ते मला पळून जायला नक्कीच मदत करणार नव्हते. पण ते कुणाचे केस होते? ते तुझे होते का? --- नाही, असे शक्य नाही --- अग शांत परी, मला सांग.”

त्याच्या मऊसर शब्दांनी उपकृत होऊन, ल्युसी त्याच्यासमोर जमिनीवर गुडघे टेकून बसली आणि तिचे हात त्याच्या बाजूला पसरले आणि त्याचे पांढरे डोके तिच्या उबदार चकाकणाऱ्या बटांमध्ये ठेऊन, कुरवाळू लागली. ती रडतारडता बोलली, “ओहो, माझ्या आवडत्या सर, तुम्हाला माझे नाव नंतर कळेलच. मी तुम्हाला आता एवढेच सांगते, की तुमचे दुःख आता संपले आहे. मी तुम्हाला इंग्लंडला घेऊन जाणार. तुम्हाला ठीक करणार आणि आपल्यासाठी छानसे घरकुल उभारणार!”

त्याच्या मुलीच्या बाहुपाशात विसावलेल्या, त्या दया येईल अशा माणसाला बघून लॉरी आणि दफार्जला एवढे भडभडून आले, की त्यांच्या डोळयात भित्र्या माणसासारखे अश्रू येऊ नयेत म्हणून, ते लांब कुठेतरी बघू लागले.

लवकरच ती दोन माणसे प्रवासाची व्यवस्था बघण्यासाठी बाहेर पडली. ल्युसी वडिलांबरोबर त्यांचा शक्तीहीन, अधू पाय तिच्या हाताने हळूवारपणे कुरवाळत राहीली.

जेव्हा सगळी तयारी पूर्ण झाली, तेव्हा मिस्टर लॉरी आणि मिस्टर दफार्ज गरम जेवण आणि उबदार प्रवासी कपडे घेऊन आले. कोऱ्या, गोंधळलेल्या व नवल वाटणाऱ्या चेहऱ्याने, डॉ मॅनेटनी ल्युसीला त्यांच्या भोवती उबदार कापड गुंडाळू दिले. ते तुरुंगातील छपराखालील खोलीत, इतकी वर्षे अडकून पडले होते, की ते कसे चालायचे हेच विसरले होते.

मिस्टर लॉरीने त्यांना जिना उतरायला मदत केली. डॉ मॅनेट ल्युसीचा हात घट्ट धरून चालत होते. मिस्टर दफार्जने चांभाराचा बाक व हत्यारे उचलली व खाली रस्त्यावर आला.

अंगणात आल्यावर डॉ मॅनेटनी तुरुंगातील मनोऱ्यांसाठी व पहारेकऱ्यांसाठी आजूबाजूला बघितले. पण एकच एकाकी आकृती त्यांच्या नजरेस पडली --- वाइनच्या दुकानातून वाकून बघणारी व रस्त्यावरील दिव्याच्या प्रकाशात विणणारी मॅडम दफार्ज! घोडागाडी थांबली होती. डॉ मॅनेट, ल्युसी आणि मिस्टर लॉरी त्यात चढले.

गाडी दूरवर जाईपर्यंत, दफार्ज तिकडे बघत उभा होता. तो कुजबुजला, “मला वाटते, पुनरुज्जीवनामुळे, त्यांना पश्चात्ताप होत नसेल.”

# प्रकरण ४

# चार्ल्स डार्नेवरील खटला



Fate Has Thrown Two Look-Alikes Together.

पाच वर्षे गेली. आता १७८० हे वर्ष होते. डॉ मॅनेट व ल्युसी इंग्लंडमधील आरामदायी घरात रहात होते. डॉक्टरांची तब्येत सुधारली होती आणि त्यांनी त्याची वैद्यकीय सेवा परत सुरु केली होती. मिस्टर लॉरी अजून टेलसन्स बँकेत काम करत होते आणि त्यांच्या लंडन व पॅरीस येथील कार्यालयातून ये जा करत होते.

पाच वर्षे इंग्लंड त्यांच्या अमेरिकन वसाहतींबरोबर युद्ध करत होते. पण एकामागून एक युद्धे हरत होते. वसाहतींच्या मदतीला फ्रान्स आले होते. त्यामुळे इंग्लंडला राग आला होता.

या कटू भावनांमुळे सरकार उलथवून टाकायचे प्रयत्न लंडनमधील बेली कोर्टात चालू होते. सरकारी गुपिते, फ्रेन्च राजाला पोचवल्याबद्दल व क्रांतीच्या काळात सैन्याबद्दलची माहिती उत्तर अमेरिकेला कळवल्याबद्दल, चार्ल्स डार्नेला दोषी ठरवण्यात आले होते. पिंजऱ्यात उभा असलेला कैदी उंच, देखणा, काळया गडद केसांचा पंचविशीचा तरुण होता. वेळोवेळी चार्ल्स डार्नेची नजर कोर्टात बसलेल्या दोन साक्षीदारांकडे जात होती. ते अलेक्झांडर मॅनेट व त्यांची मुलगी ल्युसी होते. ल्युसी तिच्या आजारी वडिलांना पाच वर्षांपूर्वी फ्रान्समधून बाहेर नेत होती, तेव्हा चार्ल्सची त्यांच्याबरोबर भेट झाली होती. या भेटीमुळे, त्यांना व तेव्हा त्यांच्याबरोबर असणाऱ्या मिस्टर लॉरी यांना कैद्याच्या विरुद्ध चाचपणी करण्यासाठी, बोलावले होते.

ब्रिटीश सरकारी वकीलाने ज्युरीला सांगितले, की डार्नेने पाच वर्षांपूर्वी क्रांतीच्या संध्याकाळी देशाविरुद्ध काही नको तो बेत आखला होता.

कैद्याचा वकील, मिस्टर स्ट्रयव्हर व मिस्टर कार्टन लांब टेबलाशी बसले होते. मिस्टर स्ट्रयव्हर सरकारी वकिलाचे बोलणे लक्ष देऊन ऐकत होते आणि कार्टन सतत छताकडे डोळे लाऊन बसला होता.

वकिलाकडून पहिला बोलावला गेलेला साक्षीदार होता, चार्ल्स डार्नेचा आधीचा मित्र व सभ्य माणूस असलेला मिस्टर जॉन बर्साद.

वकिलाने सुरु केले, "तुम्ही कैद्याविरुद्ध का साक्ष देत आहात?"

"कारण सर, मी त्याचे फसवे बेत ओळखले आणि मी देशभक्त असल्याने, मी ते लगेच सरकारला कळवले."

"आणि ते बेत काय होते?"

"तो त्याच्या हस्ताक्षरात, ब्रिटीश वसाहतींमधील सैन्याच्या हालचालींच्या याद्या फ्रेन्चाना पाठवत होता.

जेव्हा मिस्टर स्ट्रयव्हर मिस्टर जॉन बर्सादची उलटतपासणी घेऊ लागले, तेव्हा त्यांनी असे दाखवून दिले, की बर्साद हा सभ्य माणूस तर नाहीच, पण तुरुंगातून सुटलेला गुन्हेगार व जुगारी आहे आणि तो डार्नेचा मित्र कधीच नव्हता. फक्त एकदा गाडीत दोघे भेटले होते.

वकीलाने मग रॉजर क्लाय, या डार्नेच्या नोकराला, पुढचा साक्षीदार म्हणून बोलावले.

"तू कैद्यांसाठी किती वर्षे काम केलेस?"

क्लाय उत्तरला, “सुमारे चार वर्षे.”

“तू कधी इंग्लंडने अमेरिकेला पाठवलेली सैन्याच्या हालचालीसंबंधी व तयारीसंबंधी माहितीच्या यादीचे कागद कैद्याकडे पाहिले आहेस का?”

“हो, पाहीले आहेत.”

“कुठे?”

“मिस्टर डार्नेच्या खिशात व टेबलाच्या खणात.”

“आणि ते कागद इतर कुणाला देतांना त्याला पाहीले आहेस का?”

“हो. डोव्हर आणि कॅलेमधील बोटीने प्रवास करणाऱ्या काही फ्रेन्च माणसांना.”

“कैद्याविरुद्ध असा पुरावा देऊन, तुझा काय लाभ होणे तुला अपेक्षित आहे?”

“काहीच नाही. हे मी माझ्या देशप्रेमाखातर करतो आहे. मी सच्चा इंग्लिशमन आहे.”

स्ट्रयव्हरच्या उलटतपासणीत, क्लायने तो चोर असल्याचे व एके काळी फ्रेंच सरकारसाठी काम करत असल्याचे कबूल केले.

वकिलाने नंतर जर्व्हीस लॉरीला साक्षीदाराच्या पिंजऱ्यात बोलावले.

“मिस्टर लॉरी, पाच वर्षांपूर्वी, नोव्हेंबर, १७७५ मधील एका शुक्रवारी, तुम्ही काही कामानिमित्त लंडन ते डोव्हर असा गाडीने प्रवास करत होतात?”

बॅंकरने उत्तर दिले, “हो.”

“गाडीत आणखी कोणी उतारू होते?”

हो, दोन माणसे.”

“त्या दोन माणसांनी रात्रीच्या मध्येच गाडी सोडली व ते रस्त्याने चालू लागले का?”

“हो.”

“कैदी, चार्ल्स डार्ने त्यापैकी एक होता का?”

मिस्टर लॉरी डार्नेकडे बघत उत्तरले, “मला खरे तर माहिती नाही. त्यांनी स्वतःला इतके गुंडाळले होते आणि रात्र इतकी अंधारी होती, की मी त्यांना ओळखण्याइतका नीट बघू शकलो नाही.”

“मिस्टर लॉरी, तुम्ही यापूर्वी कधी कैद्याला बघितले होते का?”

“हो, मी काही दिवसांनी फ्रान्सहून परतत होतो, तेव्हा. मिस्टर डार्ने मला इंग्लंडला परत आणणाऱ्या त्याच बोटीत होते.”

“ती बोट कॅलेला केव्हा आली?”

“मध्यरात्रीनंतर थोड्या वेळाने.”

“मिस्टर लॉरी, तुम्ही एकटेच प्रवास करत होतात का?”

“नाही सर, माझ्याबरोबर दोघेजण होते. डॉ अलेक्झांडर मॅनेट व त्यांची मुलगी, ल्युसी.”

“तुम्ही त्या वेळी कैद्याशी बोललात का?”

"नाही. ती वादळी रात्र होती आणि तो सर्व वेळ मी माझ्या केबिनमध्ये होतो.

वकील बोलला, "मिस्टर लॉरी, मी तुमचा आभारी आहे. माझे बोलून झाले. तुम्ही पायउतार होऊ शकता. आता मी मिस ल्युसी मॅनेटला बोलावतो. ती तरुण स्त्री खूप दयेने चार्ल्स डार्नेकडे बघत व सावकाश चालत साक्षीदाराच्या पिंजऱ्याशी आली.

वकिलाने विचारले, "मिस मॅनेट, तुम्ही पहील्यांदा कैद्याला केव्हा भेटलात?"

"आताच मिस्टर लॉरीने सांगितलेल्या बोटीवर. मी डेकवर माझ्या वडिलांचे अंथरूण तयार केले होते. कारण ते दमले होते व अशक्त झाले होते. मला त्यांना ताजी हवा द्यायची होती. मिस्टर डार्ने तिथे आले व त्यांनी सुचवले, की मी वाऱ्यापासून व थंडीपासून, माझ्या वडिलांचे कसे रक्षण करू शकेन. तो माझ्या वडीलांच्या बाबतीत फार दयाळू व सभ्य होता. मी त्याच्याशी फार कृतज्ञ होते."

"कैदी बोटीवर एकटाच आला होता का?"

"नाही सर, त्याच्याबरोबर एक फ्रेन्च माणूस होता. तो कॅले येण्यापूर्वीच उतरला."

"बोटीत असतांना ते काय करत होते?"

"ते काही कागदांकडे बघून, कुजबुजत होते."

"ते कुठ्ल्या प्रकारचे कागद होते?"

‘मला माहिती नाही.”

“कैद्याने तुम्हाला त्याच्या व्यवसायासंबंधी काही सांगितले का?”

ल्युसीने चार्ल्स डार्नेकडे बघून, हुंदके द्यायला सुरवात केली. मग वकीलाकडे पाठ फिरवून, म्हणाली, “मिस्टर डार्ने माझ्या वडिलांशी प्रेमळपणे वागले. मी अशी आशा करते, की आज मी त्याना काही त्रास दिला नसेल.”

जज्ज बोलला, “हे तुमचे कर्तव्य होते, मिस मॅनेट. ज्युरीला तो काय बोलला, ते फक्त सांगा!”

“तो मला म्हणाला, की तो महत्वाच्या व्यवसायासाठी प्रवास करतो. असेही बोलला, की त्याच्या व्यवसायामुळे त्याला इंग्लंड व फ्रान्स अशा फेऱ्या सतत माराव्या लागतात व यापुढेही माराव्या लागणार आहेत.”

“त्या व्यवसायाचे स्वरूप अमेरिकन वसाहतींशी निगडीत असल्याचे तो बोलला का?”

“तो म्हणाला की अमेरिकेशी भांडणारे इंग्लंड मूर्ख आहे. तो विनोदाने असेही बोलला, की जॉर्ज वॉशिंग्टन इतिहासात, राजा तिसऱ्या जॉर्ज इतका प्रसिद्ध झाला.

या उत्तराने कोर्टात हळू आवाजात पुटपुट ऐकू आली आणि जज्जकडून त्यांच्या लिखाणावर रागीट कटाक्ष टाकला गेला. त्याने विचार केला, ‘आपल्या राजाचा अपमान झाला.’

परत सगळे शांत झाले, तेव्हा वकील म्हणाला, “मिस मॅनेट, मी तुमचा आभारी आहे. माझे बोलून झाले. आता मी डॉ अलेक्झांडर मॅनेटला बोलावतो.”

त्याचा घसा खाखरुन, जज्जने सुरु केले. “तुम्ही ज्या व्यक्तीला पाच वर्षांपूर्वी बोटीवर भेटलात, तीच व्यक्ती हा कैदी आहे का?

डॉक्टर बोलले, “सर, मला त्या काळातील काहीही आठवत नाही.”

“डॉ मॅनेट, कोर्टात खटला चालवल्याशिवाय तुम्ही फ्रान्सच्या तुरुंगात खूप काळ व्यतीत केला का?”

“सर, खूपच लांब काळ. आणि त्यामुळे, माझे मन कोरे झाले आहे. एक दिवस मी लंडनमधील माझ्या घरी माझ्या प्रिय मुलीच्या काळजीपूर्वक वागण्याने माणसात आलो. तोपर्यंत मी जवळजवळ भ्रमिष्ट झालो होतो.”

वकील म्हणाला, “ठीक आहे, डॉ मॅनेट. मला अजून काही प्रश्न विचारायचे नाहीत.”

डॉक्टर साक्षीदाराच्या पिंजऱ्यातून बाहेर पडले आणि पुन्हा त्यांच्या मुलीजवळ जाऊन बसले. नंतर दुसऱ्या साक्षीदाराला बोलावण्यात आले.

प्रश्न विचारतांना, माणसाने चाचपणी करून खात्री केली, की १७७५ मधील शुक्रवारी रात्री, त्याने कैद्याला जिथे ती दोन माणसे गाडीतून उतरली, तेथील शहरामधील हॉटेलमध्ये कोणाची तरी वाट बघत असतांना पाहीले होते. वकिलाने ज्युरींना पटवण्याचा प्रयत्न केला, की डार्ने अपरात्री गाडीतून उतरला व सैन्याबद्दलच्या गुप्त माहितीची देवाणघेवाण करायला हॉटेलकडे चालत गेला.

मग चार्ल्स डार्नेचा वकील, मिस्टर स्ट्रयव्हर यांनी साक्षीदारांची उलट तपासणी चालू केली. नंतर लगेच आतापर्यंत खटल्याच्या सुनावणीत भाग न घेतलेला त्यांचा सहाय्यक मिस्टर कार्टनने छतावरील त्याची नजर काढून, डोके खाली केले. वयस्क वकिलाचा केसांचा टोप काढला आणि एका कागदाच्या तुकड्यावर काहीतरी लिहिले.

जरी कार्टन स्वतः चांगला बुद्धिमान होता, तरी त्याचा आळशीपणा आणि सतत पिणे यामुळे तो यशस्वी होऊ शकत नव्हता. त्यामुळे त्याला स्ट्रयव्हरच्या सहाय्यक पदावर समाधान मानावे लागत होते. स्ट्रयव्हरचे काम जोरात चालू असल्याने कार्टन त्याचा फारच हेवा करत असे.

कार्टनने कागदाची घडी घालून, स्ट्रयव्हरला दिली. त्याने ती लगेच वाचून तो प्रश्न विचारत असलेल्या साक्षीदाराकडे पाठ फिरवली.

“मला खात्री आहे.”

“तू अगदी कैद्यासारख्या दिसणाऱ्या कुणाला कधी पाहिले आहेस का?”

“दोघाना वेगळे ओळखता येणार नाही इतके साम्य नाही, पण तरी बरेचसे आहे.”

स्ट्रयव्हरने सिडने कार्टनकडे निर्देश करत आज्ञा दिली, “मग परत कैद्याकडे पहा.”

ती दोन माणसे इतकी सारखी दिसत होती, की जज्ज व साक्षीदारच नव्हे तर कोर्टातील इतर माणसेही आश्चर्यचकित झाली.

मिस्टर स्ट्रयव्हर यांनी मग बचाव करण्यासाठी त्यांच्या केसचा सारांश काढला. त्यांनी असे सांगितले, की जॉन बर्साद खोटारडा आहे. रॉजर क्लाय भाडोत्री हेर व फसव्या आहे आणि अंतिम साक्षीदार खरे तर हॉटेलमध्ये पाहिलेल्या कैद्याला ओळखू शकलेला नाही. ज्युरींनी नंतर कैद्याचे भवितव्य ठरवण्यासाठी, खोली सोडली.

दुपार संध्याकाळमध्ये बदलली. कोर्टरूममध्ये दिवे लागले. प्रेक्षकांनी खायला मटण सामोसे आणि कडू बिअर आणली. शेवटी ज्युरी निर्णय घेऊन परतले --- दोषी नाही!

कोर्टातील गर्दी दारामधून बाहेर पडली. चार्ल्स डार्ने सिडने कार्टनकडे तोंड करून समोरासमोर उभा राहिला.

प्यायलेल्या अवस्थेत सिडने कार्टन हसतहसत बोलला, “इथे नशीबाने एकत्र फेकलेले अगदी सारखे दिसणारे आपण दोघे उभे आहेत.”

डार्नेने विचारले, “मग हे नशीब मला उदास का बनवते आहे?”

कार्टन उत्तरला, “कदाचित, तुला भूक लागली आहे. चल, आपण एकत्र जेऊ.”

लवकरच ते दोघे एका जवळील खानावळीत खाणे व वाइन समोर घेऊन बसले होते. त्यामुळे डार्नेला शक्ती येत होती. त्याने कार्टनचे मनापासून आभार मानले.

वाइनचा मोठा घुटका घेत, तो वकील बोलला, “तुला माझे आभार मानायची गरज नाही. हे काहीच नाही. पण एक ल्युसी मॅनेटसारखी सुंदर तरुणी तुझी दया येऊन, तुझ्यासाठी रडते आहे हे बघून, तुला छान वाटले असेल.”

चार्ल्स खात होता व कार्टन पित होता. जेवण संपल्यावरही तो खूप वेळ पित होता. शेवटी चार्ल्स जाण्यासाठी उठला.

कार्टन त्याच्या मागे जात बोलला, “जर तुला माहिती करून घ्यायचे असेल, की मी इतकी वाइन का पितो, तर याचे कारण म्हणजे मी आयुष्याबद्दल नाराज आहे. मी सर्व बाबतीत हरणारा आहे. माझे काम, माझे मित्र --- तुझ्याकडे सर्व काही आहे. माझ्याकडे काही नाही. जसे ल्युसी मॅनेट तुझ्यासाठी करते आहे, तसे ते निळे डोळे माझ्यासाठी अश्रू ढाळणार नाहीत. पण काही हरकत नाही! मी कुणाची काळजी करत नाही व कोणी माझी काळजी करत नाही!” आता रिकाम्या झालेल्या बाटल्यांवर वाकलेल्या आकृतीकडे बघून डार्ने बोलला, “हे ऐकून मला वाईट वाटले. तुझ्या बुद्धीमत्तेचा तू याहून चांगला उपयोग करायला पाहिजे होतास.”

नंतर संध्याकाळी उशीरा खानावळीत भरपूर वाइन प्यायल्यानंतरची झोप झाल्यावर, मिस्टर सिडने कार्टन रोजच्याप्रमाणे स्ट्रयव्हर यांच्या कार्यालयात काही कायदेशीर कागदांच्याबाबत मदत करण्यासाठी गेला. स्ट्रयव्हर हा प्रसिद्ध व यशस्वी वकील होता. ते खरे तर असे होते, की कोर्टातील त्याची हुशारी ही त्याच्या संध्याकाळच्या कार्टनबरोबर काम करण्याने आलेली होती. कार्टनच्या बुद्धिमत्तेने स्ट्रयव्हरच्या खूप केसेस सोडवल्या होत्या.

स्ट्रयव्हर व कार्टन फाईल्सनी व वाइनच्या बाटल्यांनी भरलेल्या टेबलाशी बसल्यावर, स्ट्रयव्हर म्हणाला, “तू आज कमाल केलीस. ती सारखे दिसण्याची कल्पना तुला कशी काय सुचली?”

“मी सहज असा विचार केला की डार्ने देखणा आहे आणि माझे नशीब चांगले असते, तर मीदेखील त्याच्यासारखाच झालो असतो.”

“नाही, माझ्या मित्रा, ते नशीब नाही. ते कष्ट करुन स्वतःला मदत करणे आहे --- तसे करायचा तू कधी प्रयत्नदेखील केला नाहीस. तुला दुसऱ्याला मदत करण्यातच समाधान मिळते, पण स्वतःला नाही. तू कायद्याच्या कॉलेजात असतानाही तसाच होतास. असे का?”

“कोणास ठाऊक?” पण याबद्दल बोलणे नकोच.”

“ठीक आहे तर मग, आपण त्या सुंदर साक्षीदार तरुणीविषयी बोलूया का?”


“मला नाही वाटत, ती इतकी सुंदर आहे.”

“सिडने तू फार नकारात्मक बोलतोस.”

यावर सिडने कार्टनकडे काही उत्तर नव्हते. त्याला स्वतःबद्दल फार अपराधी वाटत होते आणि नेहमीप्रमाणे तो खूप प्यायला होता. त्यामुळे त्याने घरी जाऊन झोपायचे ठरवले, जेणेकरून त्याला नैराश्यामुळे व दुःखामुळे आलेले रडू मनसोक्त रडता आले असते. अनेक रात्री त्याची उशी आसवांनी भिजली होती.

# प्रकरण ५

# भीतीचा थरारक क्षण



Terror on Dr. Manette's Face!

चार्ल्स डार्नेवरील खटल्याला चार महिने होऊन गेले होते. ती रविवारची दुपार होती. जर्व्हीस लॉरी लंडनमधील मॅनेट्स यांच्या लहानशा घरी त्यांना बोलावण्यासाठी आले होते. डॉक्टरांच्या खोलीत बसून, ते येईपर्यंत वाट बघतांना मिस्टर लॉरींचे डोळे चांभाराच्या बाकावर व हत्यारांवर खिळले --- ते डॉक्टर मॅनेट यांच्या तुरुंगवासातील भयानक आठवणींचे प्रतीक होते.

चार्ल्स डार्नेवरील खटल्याला चार महिने होऊन गेले होते. ती रविवारची दुपार होती. जर्व्हीस लॉरी लंडनमधील मॅनेट्स यांच्या लहानशा घरी त्याना बोलावण्यासाठी आले होते. डॉक्टरांच्या खोलीत बसून, ते येईपर्यंत वाट बघतांना मिस्टर लॉरींचे डोळे चांभाराच्या बाकावर व हत्यारांवर खिळले. त्यांच्यामागून एक आवाज बोलला, “तुम्ही कशाकडे एवढे निरखून बघत आहात?”

मिस प्रॉसचा आवाज ऐकून, मिस्टर लॉरी वळले. त्यांना पाच वर्षांपूर्वीच्या त्या रानटी डोळ्यांच्या बाईबरोबरची डोव्हरमधील पहीली भेट आठवली. तिची ल्युसीवरील व डॉक्टरांवरील भक्ती अनुभवून, त्यांनी स्पष्ट केले, “मला नवल वाटते, अजून डॉक्टरांनी या वस्तू का जपून ठेवल्या आहेत.”

मिस प्रॉस फटकारत म्हणाली, “मला नाही माहीत. पण मला हे माहिती आहे की आज इथे खूप लोक येणार आहेत. असे काही तरुण लोक की जे माझ्या

आवडत्या ल्युसीच्या योग्यतेचे नाहीत. फक्त एकच मनुष्य तिच्या योग्यतेचा आहे --- माझा आवडता भाऊ, सॉलोमन --- फक्त त्याने आयुष्यात ती एक चूक केली नसती तर!"

मिस्टर लॉरींना सॉलोमन प्रॉसने केलेली एक चूक माहिती होती, ती म्हणजे, म्हणजे बहिणीला गरिबीत ढकलून, अनेक वर्षांपूर्वी लंपास केलेली तिच्या वाटची सर्व संपत्ती! पण आता त्याला त्याचे काही वाटत नव्हते.

लगेचच डॉक्टर मॅनेट व ल्युसी खोलीत अवतीर्ण झाले आणि ते सगळे बाहेर बागेत गेले. ते तिथे लंडनमधील जुन्या इमारतींबद्दल बोलत बसले होते. तेव्हा तिथे चार्ल्स डार्ने आला.

त्यांच्याबरोबर संभाषणात सहभागी होत, चार्ल्सने विचारले, "तुमच्यापैकी कुणी मनोरा बघितला आहे का? माझ्या खटल्यापूर्वी, मी तिथे तुरुंगवासात होतो."

डॉक्टर म्हणाले, "ल्युसी व मी तिथे काही वेळा होतो. हे चांगले रुचीपूर्ण आहे."

"मी तिथे होतो, तेव्हा मी काही वेगळयाच गोष्टी शिकलो. असे दिसत होते, की काही दुरुस्ती करतांना, कामगारांना एक अनेक वर्षे पडून असलेला जुना जमिनीखालील राजवाड्यातील तुरुंग दिसला. त्याच्या आतील भिंतीचा प्रत्येक दगडावर नावे, तारखा व कैद्यांच्या तक्रारी लिहिलेल्या होत्या. जमीन खणताना, कामगारांना कागदाची राख सापडली. कुणा अनामिक कैद्याने एक

चिठ्ठी लिहिली होती व जेलरपासून, ती लपवून ठेवली होती. काय लिहिले होते, ते कधीच कळणार नाही.

डॉक्टर मॅनेटने श्वास रोधून घरला आणि त्यांचे हात त्यांच्या डोक्याकडे गेले. क्षणभर त्यांच्या चेहऱ्यावर भीती दाटून आली.

ल्युसी ओरडली, “बाबा, तुम्हाला बरे वाटत नाही का?”

डॉक्टर लगेच त्यातून बाहेर येत बोलले, “नाही प्रिय मुली, मला वाटते माझ्या अंगावर पावसाचे चार थेंब पडले. आपण आत जायला हवे.”

पण मिस्टर लॉरींना ते भीतीचे सावट बघून अंगावर शहारा आला.

# प्रकरण ६

# मार्क्विस सेंट एव्हरमॉन्ड



"I Saw a Man Swinging by the Chain."

फ्रान्समधील राजाच्या दरबारातील एक उमराव, मार्क्विस सेंट एव्हरमॉन्ड याने १७८० मध्ये, राजवाड्यातील एक मोठा देखण्या समारंभाला हजेरी लावली होती.

पाहुण्यांनी भरजरी कपडे व दागिने घातले होते आणि चविष्ट जेवण टेबलावर मांडले होते. राजवाड्यापासून काही अंतरावर, गरीब लोकांच्या वस्तीत खपाटीला गेलेली पोटे व अंगावर चिंध्या पांघरलेले लोक यांच्यात फारच विरोधाभास जाणवत होता.

जेव्हा समारंभ संपला, तेव्हा उद्दाम व छानछोकीचे कपडे केलेला साधारण साठीचा मार्क्विस त्याच्या गाडीत चढला. त्याला पॅरीस लवकरात लवकर सोडायचे होते. समारंभाच्या वेळी राजाने त्याच्याकडे दुर्लक्ष केले होते आणि त्याला त्याचा राग आला होता. त्यामुळे त्याचा चालक भरधाव वेगाने चालवत असलेली गाडी त्याला चांगली वाटत होती, कारण त्यामुळे सामान्य लोक सैरावैरा पळत सुटले होते.

जेव्हा गाडी एका कोपऱ्याशी आली, तेव्हा एक उबग आणणारा मोठा आवाज झाला. घोडे थांबले आणि आणि मार्क्विसच्या कानांपर्यंत तो आवाज पोचला. त्याने चालकाला गाडी तशीच पुढे दामटायची आज्ञा दिली असती, पण दहा माणसांच्या वीस हातांनी घोड्यांचा लगाम पकडून ठेवला. खिडकीतून बाहेर पाहिल्यावर त्याला एक रात्रीची टोपी घातलेला उंच माणूस घोड्यांच्या पायांखालील गाठोडे काढतांना दिसला. तो खाली चिखलात वाकून, एखाद्या रानटी पशूसारखा ओरडू लागला.

एक चिंध्या पांघरलेला माणूस बोलला, “मिस्टर मार्क्विस, ऐका. तो त्याचा मुलगा आहे.”

जेव्हा तो माणूस उठून घाईने धावत, गाडीकडे येऊ लागला, तेव्हा मार्क्विसने त्याची तलवार काढली.

मुलाचे वडील किंचाळले, ”मारला गेला. मेला.”

मार्क्विसने खिडकीतून बाहेर गर्दीकडे पाहीले व त्याचा हात त्याच्या पैशांच्या पाकिटाकडे गेला. तो बोलला, “मला कळत नाही, लोक त्यांची व त्यांच्या मुलांची काळजी का घेऊ शकत नाहीत! तुमच्यापैकी कुणीतरी नेहमी गाडीच्या वाटेत येतो. तुम्ही माझ्या घोड्यांना इजा केली असेल. हे घ्या पैसे. त्या माणसाला द्या.” त्याने एक सोन्याचे नाणे खाली रस्त्यावर फेकले. त्याच क्षणी हुंदके देणाऱ्या वडिलांजवळ एक माणूस धावला व त्याचे सांत्वन करू लागला. “गास्पर, धीराने घे. या गरीब बिचाऱ्या मुलाला भुकेने कळवळून व असल्या जखमा घेऊन जगण्यापेक्षा काही दुखणे न होता मृत्यु आला, हे त्यातल्या त्यात बरे झाले.”

मार्क्विस हसतहसत बोलला, “शहाणा मनुष्य! तुझे नाव काय?”

“मी दफार्ज. वाइन विकणारा.”

“ते नाणे उचल आणि तुला पाहिजे तसे खर्च कर.” असे बोलत मार्क्विसने अजून एक नाणे गाडीतून बाहेर टाकले. पण तो मोठ्या समाधानाने हसत, त्याच्या जागेवर बसतो न बसतो, तोच ते नाणे परत त्याच्याकडे गाडीत फेकले गेले.

मार्क्विस ओरडला, “हे कुणी फेकले?”

त्याने दफार्ज उभा असलेल्या जागेकडे बघितले. गरीब बिचारे वडील फूटपाथवर शोक करत बसले होते आणि त्याच्या शेजारी एक काळ्या केसांची बाई विणत उभी होती.

त्या शांत शेतकऱ्यांकडून काही उत्तर न मिळाल्याने --- फक्त मॅडम दफार्जकडून एक दीर्घ, कडक नजर टाकली गेली --- मार्क्विसने घोडे पिटाळायची आज्ञा दिली.

नंतर अनेक तासांनी सूर्यास्ताच्या वेळी गाडी एका गरीब गावात शिरली आणि एका ठरलेल्या घराशी थांबली. तो एक तबेला होता. तिथे घोडे बदलायचे होते. खूप गरीब शेतकरी तिथे गाडीभोवती जमा झाले. त्यात निळी टोपी घातलेला एक करड्या केसांचा मनुष्यदेखील होता. तो त्याची टोपी काढत बोलला, “मिस्टर मार्क्विस, मी रस्ता दुरुस्त करणारा आहे. तुमची गाडी गावाबाहेरील रस्त्याने येत असतांना, मी एक माणसाला चाकाच्या साखळीला लोंबकाळताना पाहिले.”

खालच्या वर्गातील लोकांशी बोलायला मार्क्विसला आवडायचे नाही.

त्यामुळे त्याने फटकारत विचारले, “तो कोण होता?”

“तो या भागातील कुणी नव्हता. मिस्टर मार्क्विस, मी त्याला माझ्या आयुष्यात यापूर्वी कधी बघितलेले नाही.”

“तो कसा दिसत होता?”

“मिस्टर मार्क्विस, तुमची गाडी इतकी जोरात धावत होती, की मला नीट बघता आले नाही.

मिस्टर मार्क्विसने तेथील मुख्य असलेल्या मिस्टर गॅबेलला बोलावले. कुणी परका माणूस गावात आल्याचे त्याला माहिती असायचे.

मार्क्विसने आज्ञा सोडली, “या माणसाने इथे रात्र घालवायचा विचार केला, तर त्याच्यावर लक्ष ठेव.” मग चालकाच्या अंगावर ओरडला, “चल, निघ.”

गाडी भरधाव वेगाने निघाली. त्या संध्याकाळी मार्क्विस त्याचा इंग्लंडहून येणारा पुतण्या चार्ल्स, याला भेटायच्या ठरलेल्या वेळी त्याच्या राजवाड्यात पोचला.

जेव्हा दोघे जेवायला बसले, तेव्हा मार्क्विसने चार्ल्सला विचारले, की तो फ्रान्सला का परतला.

चार्ल्स बोलला, “सर, आपले कुटुंब हे मोठी पत असलेले आहे. पण आपण लोकांना चांगली वागणूक दिली नाही आणि आता आपल्याला त्याचे परिणाम भोगायला लागतील. माझ्या वडिलांनी त्यांच्या चैनबाजीत अडथळा आणणाऱ्या प्रत्येकाला शिक्षा केली आणि माझ्या वडिलांचे जुळे भाऊ असलेल्या व त्यांच्या मालमत्तेचे वारस असलेल्या तुम्हीदेखील लोकांवर अन्याय केला. मरणशय्येवर माझ्या आईने मला लोकांवर दया दाखवायला सांगितले आणि तुम्ही दोघे जे वाईट वागलात, त्याची भरपाई करायला सांगितले. मी गेले कित्येक वर्षे हे करायचा प्रयत्न करतो आहे. गरीब शेतकऱ्यांना मदत करण्यासाठीच मी फ्रान्सला परत आलो आहे.”

मार्क्विस ठामपणे म्हणाला, “आपण या कुटुंबात जन्म घेतला आणि मी तरी फ्रान्समधील शेतकऱ्यांना येथील राज्य करायची पद्धत बदलू देणार नाही. त्यासाठी मग मला तुझ्याशी युद्ध करून, तुला तुरुंगात टाकावे लागले, तरी चालेल.”

चार्ल्स खिन्नतेने बोलला, “ही मालमत्ता आणि हा देश दोन्ही माझ्यासाठी मेले.”

फ्रान्स हा नष्ट होण्याच्या मार्गावर असलेला समस्यापूर्ण देश आहे. मी कुठेतरी दुसरीकडे राहून माझ्या पायांवर उभा राहीन.”

आरामशीर खोलीकडे नजर टाकत, मार्क्विस ओरडला, “आहा! मला वाटते, तू इंग्लंडमध्ये राहाशील.”

“हो, तिथे मला माझ्या कुटुंबाच्या नावाची लाज वाटणार नाही. कारण मी ते वापरणारच नाही.”

मार्क्विसने लबाडीने हसत विचारले, “फ्रान्समधील इतर काही लोकही इंग्लंडला पळून गेले आहेत. तुला एक डॉक्टर व त्याची मुलगी माहिती आहेत का?”

“हो, पण तुम्ही हे का विचारत आहात?”

त्याच्या पुतण्याला काही उत्तर न देता, एका नोकराला हाक मारून, मार्क्विसने संभाषण सपवले. आणि नोकराला चार्ल्सच्या खोलीत त्याला घेऊन जायला सांगितले.

झोपण्यासाठी चार्ल्स जेव्हा अंथरुणावर पडला, तेव्हा त्याने दिवसभरातील घटनांचा विचार केला. राजवाड्यातील समारंभ, गाडीखाली मेलेला मुलगा, शोक करणारे वडील, रस्ते दुरुस्त करणारा माणूस आणि चाकाच्या साखळीला लोंबकाळणारा माणूस. ‘‘खरेच, फार वाईट दिवस होता.’ एवढे पुटपुटल्यावर, त्याला झोप लागली.

मार्क्विस झोपल्यावर, राजवाड्याच्या पुढील दगडी भिंतीवर रात्रीचा काळोख पसरला. गेटजवळ सरकणारा शांत पदरव अजिबात ऐकू आला नाही.

जेव्हा दुसऱ्या दिवशी उजाडले, तेव्हा तिथे मार्क्विस उशीवर झोपलेल्या बाजूला राजवाड्याची दुसरी दगडी भिंत होती. आणि त्याच्या छातीत सुरा खुपसलेला होता. तिथे भीतीचे सावट पसरले होते त्याच्या मुठीला चिठ्ठी लटकवलेली होती,

‘तो त्याच्या थडग्यासाठी तयार आहे. जेक्युसकडून ‘

# प्रकरण ७

## सिडनेची कबुली



A Promise To Lay Down His Life for Her

येणाऱ्या वर्षात चार्ल्स डार्ने यशस्वी शिक्षक आणि फ्रेन्चचा भाषांतरकार म्हणून प्रसिद्ध झाला. जसजशी त्याची प्रसिद्धी वाढायला तसतसे त्याचे ल्युसीवरील प्रेमही वाढू लागले तेव्हा मग उन्हाळ्यातील एका दिवशी, त्याने ठरवले की डॉ मॅनेट यांना ल्युसीचा हात आपल्या हातात देण्याविषयी विचारायचे.

डॉक्टर म्हणाले, “तुझे तिच्यावर प्रेम असल्याचे, मला माहिती आहे. पण ल्युसीचे तुझ्यावर प्रेम आहे का? तिला तुझ्याशी लग्न करायची इच्छा आहे का?”

“नाही, सर. मला वाटले इतर कुणी इच्छुक व्यक्ती असतील, तर आधी तुमच्याशी बोलावे.”

“मिस्टर कार्टन आम्हाला सतत फोन करत असतात.”

चार्ल्स बोलला, “अजून काहीतरी आहे, सर. मला वाटते, आपल्यात काही आडपडदा नसावा. मला माझे खरे नाव आणि मी इंग्लंडमध्ये का रहातो, हे तुम्हाला सांगायचे आहे.”

डॉक्टर त्यांची बोटे चार्ल्सच्या ओठांवर ठेवत ओरडले, “थांब! मला ते आता सांगू नकोस. जर तू आणि ल्युसीने लग्न केले, तर त्या दिवशी तू मला ते सांग. आता ल्युसी परतण्यापूर्वी जा. मला तिच्याशी एकटीशी बोलावे लागेल.”

जेव्हा तासाभराने ल्युसी घरी आली, तेव्हा तिला तिच्या वडिलांची वाचायची खुर्ची रिकामी पाहून, आश्चर्य वाटले. मग डॉक्टरांच्या झोपायच्या खोलीतून काही ठोकल्याचा आवाज आला. ते बहुधा बाकावर बसून

चांभारकाम करत असावेत, असे समजून, ल्युसी भीतीने गारठून गेली. थरथर कापत, ती वर गेली आणि तिने त्यांच्या पायाशी लोळण घेतली. ती त्याना बरोबर घेऊन खूप वेळ फेऱ्या मारत राहिली. रात्री उशीरा ते शांत झोपल्यावर, ती तिथून निघाली.

त्याच वर्षी अजून एक मनुष्य ल्युसीच्या प्रेमात पडला. पण चार्ल्स डार्नेसारखा तो स्वतःला ल्युसीच्या योग्य समजत नव्हता. त्याचे जीवन यशस्वी नव्हते. तो बेसुमार पित असे. पण त्याच्यात असे काही होते, की त्याने त्याच्या भावना काही करून, ल्युसीपर्यंत पोचवल्या. त्यामुळे एका दुपारी सिडने कार्टनची पाऊले मॅनेट यांच्या घरी ओढली गेली.

जेव्हा ल्युसीने त्याचे घराच्या हॉलमध्ये स्वागत केले, तेव्हा तिला त्याच्या चेहऱ्यावर काही विचित्र भाव दिसले. तिने विचारले, “मिस्टर कार्टन, तुम्ही आजारी आहात का?”

“नाही, पण माझे आयुष्य ठीक नाही.”

“मला विचारल्याबद्दल माफ करा. पण तुम्हाला तुमचे आयुष्य बदलता येणार नाही का?”

त्याचे डोळे भरले. तो म्हणाला, “आता ते बदलायला फार उशीर झाला आहे. मी आता आहे, त्यापेक्षा अजून चांगला होऊ शकत नाही आणि मला भीती आहे, की मी आहे त्यापेक्षा अजून खाली जाईन. तरी मला आशा आहे, की मला काय म्हणायचे आहे, ते तू ऐकून घेशील”

“जर ते ऐकून तुला बरे वाटणार असेल, तर मी अर्थात ते ऐकून घेईन.”

“मिस मॅनेट, तुझ्या दयाळूपणाबद्दल आभार. या दारुड्या, फुकट गेलेल्या, वाईट अशा या माणसाच्या प्रेमाची परतफेड तू केली असतीस, तर फक्त दुःखच तुझ्या वाट्याला आले असते. त्यामुळे आपले प्रेम कधीही सफल होणार नसल्याचा मला आनंद आहे.”

“पण मिस्टर कार्टन, मी तुम्हाला दुसऱ्या कुठल्या मार्गाने मदत करू शकणार नाही का?”

“नाही, मिस मॅनेट. माझे ऐकून घेतल्याबद्दल मी तुझा आभारी आहे. तुझा सुंदर चेहरा आणि तू तुझ्या वडिलांकरता व स्वतःकरता बनवलेले हे छानसे घर बघेपर्यंत, मला कुठल्याही घराबद्दल किंवा कुटुंबाबद्दल काही भावना उरल्या नव्हत्या.”

“पण मिस्टर कार्टन, मी माझ्या प्रभावाने तुमचे आयुष्य आधिक चांगले करू शकणार नाही का?”

“मिस मॅनेट, तू आधीच माझ्यावर प्रभाव टाकला आहेस. त्यामुळे मी आतापर्यंत कधी कुणासमोर उघडे न केलेले माझे हृदय तुझ्यापुढे उघडे केले आहे. आणि तुला माझी शपथ आहे, की मी तुला असे काही म्हटल्याचे, तू कधीही कुणाला सांगू नकोस.”

“मी तसे वचन देते.”

तिचा हात उचलून ओठाशी लावत. तो बोलला, “आभारी आहे. कृपया नेहमी हे लक्षात ठेव, की खरा सिडने कार्टन हा माणूस आता तुझ्यासमोर उभा आहे आणि तो कधी तुझ्यासाठी स्वतःच्या प्राणांचेही मोल द्यायला मागेपुढे पहाणार नाही --- ठीक आहे, मिस मॅनेट. तुझे भले होवो.”

# प्रकरण ८

# स्मशान चोर



"Fishing" Among the Graves!

निरोप्या जेरी क्रंचर नेहमीप्रमाणे टेलसन्स बँकेच्या बाहेर बसलेला होता. तेव्हा फ्लिट रस्त्यावरून लोकांचा एक जमाव कवायत करत आला.

जवळ बसलेल्या त्याच्या मुलाला त्याने सांगितले, "ही प्रेतयात्रा आहे."

जेरीला प्रेतयात्रा फार आकर्षित करत असत. पण ही फार वेगळ्या प्रकारची प्रेतयात्रा होती कारण लोक कॉफिनच्या कडेने चालतांना ओरडत होते, "हेर! हेर!"

जेव्हा कोणीतरी कुजबुजले, की मेलेला माणूस रॉजर क्लाय होता, तेव्हा जेरी स्वतःशीच पुटपुटला, चार्ल्स डार्नेच्या खटल्याच्या वेळी असणारा माणूस!"

जेरी त्या लोकांच्या मागून, स्मशानात गेला. मेलेल्या माणसाला पुरलेले पाहिले आणि मग घरी गेला. त्या रात्री त्याने बायकोला व मुलाला सांगितले, की तो मासे पकडायला जातो आहे.

मुलाने विचारले, "पण दर वेळी तुम्ही मासे पकडायला जाता, तेव्हा तुमचे बूट खराब होतात आणि तुमच्या नखात तपकिरी गंज गेलेला असतो, असे कसे?"

जेरीने फटकारले, "आता अजून प्रश्न नको. झोपायला जा."

जेव्हा त्याचे कुटुंब झोपले, [किंवा त्याला तसे वाटले], तेव्हा जेरीने

कपाट उघडून, एक पोते, एक काही उघडण्यासाठीचे लोखंडी हत्यार, एक दोरी व एक साखळी घेतली.

त्याचा मुलगा अंथरुणातून उठून, सुरक्षित अंतरावरून, त्याच्या मागे जाऊ लागला. अजून दोन मासे पकडणारी माणसे अवतरली. ती तिघेजण सुनसान रस्त्याने चालू लागली. मग ते एका लोखंडी दारावर चढले.

दारातून डोकाऊन, मुलाने चर्चच्या आवारातील स्मशानात त्या तिघांना 'मासे पकडताना' पाहिले. जेव्हा त्यांनी कॉफिन वर उचलले, तेव्हा मुलगा घाबरून घरी पळून गेला!

क्रंचरच्या घरी दुसऱ्या दिवशी न्याहारीला मासे नव्हते.

# प्रकरण ९

# हेर



The Road Fixer Tells His Story.

मॅडम दफार्ज वाइनच्या दुकानात बसली होती. सेंट अँटोनी भागात राजाकडून नेहमी हेर पाठवले जात. विणता विणता तिचे लक्ष त्यांच्यावर होते.

गावाकडील तीन दिवसांच्या प्रवासाहून परतत, अर्नेस्ट दफार्ज म्हणाला, “माझ्या बायको, शुभ दिवस. माझ्या प्रवासात मी या चांगल्या माणसाला भेटलो.” त्याने त्याच्या शेजारील निळया टोपीवाल्या माणसाकडे निर्देश केला. “तो रस्ते दुरुस्त करतो. माझ्या नवीन मित्राला काही खायला दे!” जेव्हा त्या दोन मित्रांनी न्याहारी संपवली, आणि दुकानात सर्व गिऱ्हाईके जाऊन, दफार्ज आणि तो रस्ते दुरुस्त करणारा, असे दोघेच उरले, तेव्हा त्या रस्ते दुरुस्त करणाऱ्याने टेबलाशी बसत, गोष्ट सांगायला सुरवात केली.

दफार्ज बोलला, “आता आपले सर्व चांगले जॅक्युस इथे असल्याने, आपण सुरवात करू. एकमेकांना ओळखण्यासाठी क्रांतीकारक खुणेचे नाव म्हणून, ‘जॅक्युस’ हा शब्द वापरत असत. रस्ते दुरुस्त करणाऱ्याकडे बोट दाखवत, त्याने म्हटले, “मी जॅक्युस क्रमांक १ आहे व हा जॅक्युस क्रमांक २ आहे. जॅक्युस, तू बोल आणि सर्वांना सारे काही सांग.”

डोक्यावरून निळी टोपी काढत, रस्ते दुरुस्त करणारा बोलला, “जेव्हा मी पहिल्यांदा गास्पार्डला पाहिले, तेव्हा तो मार्क्विसच्या गाडीखाली साखळीला धरून लोंबकळत होता. पण तो त्याला मारायचा बेत करतो आहे, हे मला माहिती नव्हते.”

जॅक्युस क्रमांक ३ म्हणाला, “तू त्याला परत केव्हा बघितलेस?”

मार्क्विसला मारल्यावर, गास्पार्ड पळून गेला. त्याने महीनानुमहीने पोलिसांना गुंगारा दिला. पण मी त्याला परत पाहिले, तेव्हा तो पकडला गेला होता. त्यानंतर मी त्याला गावातील चौकात चाळीस फूट उंच फासावर लटकवलेले पाहिले. मी ते बघून इतका चिडलो, की मी सूर्यास्ताच्या सुमाराला ते गाव सोडले. रात्रभर व दुसरा अर्धा दिवस मला जॅक्युस भेटेपर्यंत चालत राहिलो.” एवढे बोलून, त्याने दफार्जकडे निर्देश केला.

दफार्ज बोलला, “तू एक चांगला माणूस असून, आमच्या गटात सामील होण्यासाठी योग्य आहेस. पण आम्हाला बोलायचे असल्याने, तू क्षणभर दुकानाबाहेर जा.”

रस्ते दुरुस्त करणारा दारातून बाहेर गेल्यावर, जॅक्युस क्रमांक ३ दुसऱ्यांकडे वळून म्हणाला, “जॅक्युस मंडळी, तुम्ही काय म्हणता?” त्याने दफार्जला विचारले, “गावातील नेमलेल्या महत्वाच्या लोकांची नावे आपल्या यादीत सामील करून घ्यावी का?”

दफार्ज बोलला, “दुर्दैवी मरणासाठी.”

जॅक्युस क्रमांक ४ ने विचारले, “अशी आपल्या शत्रूंची यादी बनवल्याने आपल्याला काही समस्या येणार नाहीत, याची तुला खात्री आहे का? मला माहिती आहे, की हे सुरक्षित आहे, कारण आपण सोडून, किंवा ती सोडून, कुणालाच ते समजणार नाही.”

दफार्ज उत्तरला, “काही काळजी करू नकोस. माझी बायको अशी यादी तिच्या डोक्यात ठेवते आणि कधीच विसरत नाही. त्यांची नावे तिच्या विणकामात ती इतक्या कुशलतेने बसवते, कीतिला ती दिवसाप्रमाणे लख्ख दिसतात. तिच्या विणकामातील शत्रूंच्या यादीतून, कुणाच्या नावातले एखादे अक्षर किंवा एखादा गुन्हाही वगळला जात नाही.

त्याच्या नवीन मित्रांसाठी हेरगिरी करण्यास रस्ते दुरुस्त करणारा परत गेल्यावर, दफार्जला त्याच्या एका पोलिसांवर पाळत ठेवणाऱ्या जॅक्युसकडून समजले, की सेंट अँटोनी भागात नवीन हेर पाठवला गेला आहे. त्याने ही बातमी ताबडतोब त्याच्या बायकोला सांगितली.

ती म्हणाली, “त्याचे नाव काय? त्याला बघितल्याबरोबर, मी त्याला माझ्या यादीत टाकते.”

“एक इंग्लीश माणूस, जॉन बर्साद.”

दुसऱ्या दिवशी, एक इंग्लिश माणूस वाइनच्या दुकानात आला. मॅडम दफार्ज नेहमीप्रमाणे विणत होती.

वाइनची मागणी करत, जॉन बर्साद बोलला, “मॅडम, तुम्ही खूप छान विणता आणि हे डिझाईनही चांगले आहे. तुम्ही काय बनवत आहात?”

“काही विशेष नाही. मी व्यग्र रहाण्यासाठी विणते” आणि तिच्या बोटांनी विणले, जॉ --- न.

तो हेर बोलला, “हा धंदा काही चांगला दिसत नाही.”

मॅडम दफार्ज म्हणाली, “हा धंदा फारच वाईट आहे. लोक इतके गरीब आहेत.” आणि ब --- र --- सा --- द, हे यादीतील नाव विणले गेले.

“या गरीब लोकांना वाईट वागवले जाते, खरे ना?”

“जर तुम्ही तसे म्हणत असाल, तर तसे.”

“तुम्हाला हे पटत नाही का?”

“मला आणि माझ्या नवऱ्याला हे वाइनचे दुकान चालवणे पुरेसे आहे. दुसऱ्या लोकांचा विचार करायला आम्हाला वेळ नाही.”

हे संभाषण त्या हेराला काहीच खाद्य पुरवत नव्हते. त्याने दुसरा विषय काढून पाहिला व सुस्कारा टाकत म्हटले, “अशा प्रकारे फाशी देऊन, गास्पार्डचे फार वाईट झाले.”

मॅडम दफार्ज म्हणाली, “माझी खात्री आहे, त्याला हे माहिती असेल, की त्याने कुणाला मारले, तर त्याला फासावर लटकवले जाणार.”

खालच्या आवाजात तो हेर बोलला, “इथे आसपास गास्पार्डबद्दल खूपच राग आणि दया आहे. तुम्हाला असे वाटत नाही का?”

प्रश्नाकडे दुर्लक्ष करत मॅडम दफार्ज बोलली, “हा माझा नवरा आला!”

हेर त्याच्या टोपीला हात लावत म्हणाला, “जॅक्युस, शुभ दिवस.”

“तुम्ही चुकता आहात, सर. माझे नाव हे नाही. मी अर्नेस्ट दफार्ज आहे.”

“ठीक आहे, काही हरकत नाही. तुझ्या बायकोबरोबर बोलतांना, मला तुझ्या नावाशी संबंधित काही नवलपूर्ण गोष्टी आठवल्या.”

“ओहो!”

“हो, जेव्हा डॉ अलेक्झांडर मॅनेट यांची सुटका झाली, तेव्हा ते तुमच्याकडे, त्यांच्या जुन्या नोकराकडे आले होते.”

दफार्ज बोलला, “हे बरोबर आहे.” त्याच्या बायकोने असे सांगत त्याच्याकडे कटाक्ष टाकला, की “त्या हेराला कमीत कमी शब्दात उत्तर दे.”

बर्सादने चालू ठेवले, “त्याची मुलगीदेखील त्याच्या सोबत होती. ती टेलसन्स बँकेतील एका सभ्य गृहस्थाबरोबर आली होती.”

दफार्ज बोलला, “हे खरे आहे.”

“तुला त्यांच्याकडून काही समजले का?”

मॅडम दफार्ज मध्येच बोलली, “नाही, ते इंग्लंडमध्ये सुखरूप पोचले असल्याचे पत्र आम्हाला मिळाले होते व एक दुसरे पत्र मिळाले. पण त्यानंतर काही नाही.”

बर्साद बोलला, “ती मुलगी जन्माने फ्रेंच असलेल्या माणसाशी लग्न करते आहे. खरे तर तो गास्पार्डने मारलेल्या मार्क्विसचा पुतण्या आहे. इंग्लंडमधील त्याचे नाव चार्ल्स डार्ने आहे.”

मॅडम दफार्ज विणत राहिली. पण तिचा नवरा, अर्नेस्ट दफार्जवर त्या बातमीचा खास परिणाम झाला. पाइप ओढतांना तो थरथर कापतांना दिसला.

दिवसाभरातील कामानंतर, शेवटी काहीतरी प्रतिसाद मिळाल्याने त्या हेराने वाइनचे पैसे भरले व दुकानातून बाहेर पडला.

दफार्ज त्याच्या बायकोच्या कानात कुजबुजला, “ल्युसीच्या लग्नाबद्दलची त्याने सांगितलेली बातमी खरी असेल का?”

तिने शांतपणे विचारले, “समजा, खरी असली, तरी त्याचे काय?”

“ --- जर आपल्या आयुष्याच्या काळात क्रांती झाली, तर मला ल्युसी मॅनेटसाठी असे वाटते, की चांगल्या नशीबाने तिचा नवरा फ्रान्सबाहेर रहातो आहे!”

मॅडम दफार्ज करवादली, “त्याला न्यायचे असेल, तिकडे नशीब घेऊन जाईल!”

“पण हे किती विचित्र आहे, की आपल्याला डॉ अलेक्झांडर मॅनेट व ल्युसी यांच्याबद्दल किती सहानुभूती वाटते. पण आता यादीमध्ये हेर बर्सादच्या नावाशेजारी तू तिच्या नवऱ्याचे नाव विणते आहेस.”

# प्रकरण १०

# योग्य वैद्यकीय सल्ला



Destroying the Shoemaker's Bench!

फक्त डॉ अलेक्झांडर मॅनेट, मिस प्रॉस आणि मिस्टर लॉरी हे ल्युसीच्या लग्नाला लहानशा चर्चमध्ये हजर राहिले. ल्युसी सुंदर वधू होती आणि चार्ल्स देखणा वर होता. जरी डॉक्टर आनंदी दिसत असले, तरी आदल्या दिवशी सकाळी चार्ल्सबरोबर झालेल्या खासगी भेटीनंतर त्यांच्या चेहऱ्यावर पसरलेली भीती, मिस्टर लॉरींना राहून राहून, आठवत होती.

जेव्हा नवपरिणीत दाम्पत्य मधुचंद्रासाठी बाहेर पडले, तेव्हा मिस्टर लॉरींना तीच भीती परत डॉक्टरांच्या चेहऱ्यावर दिसली. डॉक्टर त्यांच्या खोलीत विश्रांतीसाठी गेल्यावर लगेचच मिस प्रॉसला हातोड्याने ठोकल्याचा आवाज येऊ लागला. ती घाईने आत गेली. व परत घाईने बाहेर आली. तिने रडक्या आवाजात मिस्टर लॉरीना सांगितले, "मी कोण आहे, हे ते जाणत नाहीत आणि त्यांनी परत जोडे बनवणे सुरु केले आहे!"

मिस्टर लॉरी गडबडीने आत गेले. डॉक्टर कामात व्यग्र होते व त्यांनी मिस्टर लॉरीनादेखील ओळखले नाही.

नऊ दिवस गेले. तरीही अजून चांभार त्याच्या बाकावर बूट बनवत बसलेला होता. आयुष्यात पहील्यांदाच जर्व्हीस लॉरीने डॉक्टर मॅनेट यांची काळजी घेणाऱ्या मिस प्रॉसला मदत करण्यासाठी, त्यांच्याशी बोलण्यासाठी व त्यांचे मन परत ताळ्यावर आणण्यासाठी, टेलसन्स बँकेतून रजा घेतली. पण

दहाव्या दिवशी, मिस्टर लॉरीने पाहीले, की डॉक्टर चांभाराचा बाक सोडून, वाचायच्या खुर्चीत बसले आहेत.

दिवसा इतक्या लवकर डॉक्टराना बोलावल्याबद्दल, उत्तर द्यावे लागेल, हे समजून मिस्टर लॉरीने विचारले, “माझ्या प्रिय डॉक्टर मॅनेट, माझा एक जवळचा मित्र विचित्र वागतो आहे. त्याच्याबाबत, तुम्ही मला काय वैद्यकीय सल्ला द्याल? तो आणि त्याची मुलगी यांच्यासाठी मला तुमची मदत हवी आहे.”

मिस्टर लॉरी अर्थात डॉक्टर मॅनेट यांच्या विचित्र वागणुकीबद्दल बोलत होते. पण दुसऱ्या कुणासाठी सल्ला घेत असल्याचे ढोंग करत होते. गेले नऊ दिवस त्याना काय झाले होते, ते सांगून ते डॉक्टरांचे मन हलवण्याचा प्रयत्न करत होते.

डॉक्टरांनी विचारले, “तुमच्या मित्राला काही मानसिक धक्का बसला आहे का?”

“हो, सर. खूप वर्षे छळ झाल्याचा तो मानसिक धक्का आहे. माझा मित्र नंतर सुधारला, पण अलीकडे त्याला परत तसाच त्रास होतो आहे.”

“किती काळ हा त्रास टिकला?”

“नऊ दिवस व नऊ रात्री.”

“तुम्ही त्याच्या मुलीचा उल्लेख केलात. तिला हे दुखणे परत उपटल्याचे माहिती आहे का?”

“नाही, ते तिच्यापासून गुप्त ठेवले गेले आहे.”

सुटका झाल्यासारखा, मिस्टर लॉरीचा हात पकडत, डॉक्टर म्हणाले, “हे तुम्ही चांगले केलेत. माझा विश्वास आहे, की तुमचा मित्र परत असा त्रास सुरु होण्याची अपेक्षा करत होता व त्याला त्याची भीती पण होती. मला वाटते तुमच्या मित्राला तो पहील्यांदा जसे विचित्र वागला, तसे वागायची आठवण करून देणारी परिस्थिती परत उद्भवली असावी. त्याची मुलगी किंवा कुणीही इतर काही म्हणाले असेल आणि त्यामुळे परत त्याला त्रासदायक ठरणाऱ्या पूर्वीच्या घटना आठवल्या असतील.”

“तुम्हाला असे वाटते का, की अशी विचित्र वागणूक भविष्यात पुन्हा घडेल?”

“मी तुमच्या मित्राच्या बाबतीत पुन्हा असे काही घडणार नाही, अशी आशा करतो. यावेळेस त्याच्यात झटपट झालेली सुधारणा, हे चांगले लक्षण आहे.”

“डॉक्टर, तुम्ही दिलेल्या सल्ल्याबद्दल, मी आभारी आहे. आता फक्त अजून एक प्रश्न. आपण असे म्हणू, की त्याच्या त्रासदायक काळात, माझा मित्र लोहाराचे काम करत होता आणि भट्टीमध्ये लोखंडाच्या वस्तू बनवत होता. त्याच्या त्रासदायक काळात, पुन्हा तो तेच करतांना सापडला. ती हत्यारे उचलून, त्याला सापडणार नाहीत, अशी ठेवावी का?”

डॉक्टर उदास होऊन बोलले, “तुमच्या मित्राला त्याच्या त्रासदायक काळाचा विचार मनात येऊ नये म्हणून, कदाचित ते काम करावेसे वाटत असेल.

कदाचित ते विचार मनात येऊ नयेत, म्हणून ती लोहाराची हत्यारे जवळ ठेवावीशी वाटत असतील.”

“मिस्टर लॉरी बोलले, “मी समजू शकतो. पण ती हत्यारे व भट्टी जवळ ठेवल्याने, त्याला ते त्रासदायक विचार जास्त प्रमाणात आठवणार नाहीत का? जर ती नाहीशी केली, तर त्याची भीती देखील जाईल, असे होणार नाही का?”

“हत्यारे आणि भट्टी हे जणू काही त्याचे जुने मित्र आहेत --- “ हे बोलतांना डॉक्टरांचा आवाज खोल गेला. मिस्टर लॉरी बोलले, “मला नक्कीच असे वाटते आहे, की माझ्या मित्राने हत्यारे आणि भट्टी हे नाहीसे करावे. मला फक्त त्याला असे सांगण्याची परवानगी तुमच्याकडून हवी आहे. कृपया त्याच्या मुलीसाठी, मला हे सांगा!”

डॉक्टर मॅनेट एक सुस्कारा टाकत म्हणाले, “मग तिच्यासाठी तुम्ही तसे करा. पण तो घरात असतांना त्या वस्तूंचा निकाल लावा.”

पुढचे काही दिवस मिस्टर लॉरी डॉक्टरांना गावात फिरायला नेत असत आणि त्यामुळे डॉक्टरांच्यात दिवसेंदिवस सुधारणा होऊ लागली.

चौदाव्या दिवशी, जेव्हा डॉक्टर मॅनेट चांगले सुधारले, व स्वतःचे स्वतः एकटे बाहेर जाऊ शकतील इतपत बळकट झाले, तेव्हा मिस्टर लॉरी आणि मिस प्रॉस गुन्हेगारांसारखे त्यांच्या खोलीत गेले. त्यांनी चांभाराच्या बाकाचे तुकडे तुकडे केले व ते भट्टीत टाकून दिले. मग त्यांनी चामडे, बूट व हत्यारे बागेत पुरून टाकली.

जेव्हा ल्युसी आणि चार्ल्स मधुचंद्राहून डॉक्टर मॅनेट यांच्या घरी परतले, तेव्हा त्याना भेटणारी पहिली व्यक्ती सिडने कार्टन होती. खटल्यानंतरच्या दिवशी त्याच्याशी प्यायलेल्या अवस्थेत उद्धटपणे वागल्याबद्दल क्षमा मागायला तो आला होता. या कुटुंबात मधूनमधून येण्याची परवानगी त्याला हवी होती व त्या कुटुंबाने त्याला मित्र मानावे, अशी त्याची इच्छा होती.


याकरता चार्ल्स व ल्युसी तयार झाले. सिडने गेल्यावर, ल्युसीने तिच्या नवऱ्याला सांगितले, "त्याचे हृदय जखमी आहे. आपण त्याला दयाळूपणे वागवले पाहीजे. तो सभ्यपणे वागेल, चांगल्या, फार चांगल्या गोष्टी करू शकेल!"

काळ पुढे गेला. ल्युसीने एका मुलगी बाळाला जन्म दिला. जशी ती मुलगी मोठी होऊन चालू, बोलू लागली तशी, ती सिडने 'काकां'ची आवडती बनली. तो वारंवार तिला भेटी घेऊन घरी येई व तासनतास तिच्याशी खेळत बसे. त्याने दारू पिण्याचे सोडले होते!

१७८९ च्या जुलैमधील एका गरम दिवशी, जेव्हा छोटी ल्युसी सहा वर्षांची होती, तेव्हा, चार्ल्स, ल्युसी व डॉक्टर मॅनेट यांना अशी बातमी सांगायला मिस्टर लॉरी घरी आले होते, की फ्रान्समध्ये क्रांतीला तोंड फुटले आहे!

# प्रकरण ११

# क्रांतीला तोंड फुटले



The Attack on the Bastille Begins!

सेंट अँटोनीचे लोक शस्त्रसज्ज होते. त्यांच्याकडे ठासून भरलेल्या बंदुका होत्या. लोखंडी व लाकडी दांडके होते शिवाय सुरे, कुऱ्हाडी आणि रस्त्यावरील व भिंतींवरील दगडही होते. लोक उपाशी रहायला आणि गरिबीला कंटाळले होते. त्यांचा राजावरील व उमरावांवरील राग शिगेला पोचला होता.

या सर्व उद्रेकाचे मुख्य ठिकाण होते, दफार्जचे वाइनचे दुकान.

बंदुकीच्या दारूने व घामाने माखलेला दफार्ज आज्ञा सोडत होता आणि शस्त्रपुरवठा करत होता.

मॅडम दफार्जच्या हातात विणकाम नव्हते, तर पिस्तुल व कुऱ्हाड होते. तिच्या कंबरेच्या पट्ट्यात सुरा होता. ती ओरडली, "मी स्त्रियांचे नेतृत्व करेन. आम्हीही पुरुषांबरोबर लढू शकू."

दफार्ज ओरडला, "आम्ही तयार आहोत. देशभक्तांनो व मित्रांनो, बॅस्टीलला चला."

एक गर्जना करून, रुंद खड्डे तुडवत, दगडी भिंतींनी अंगावर खरचटवून घेत आणि दोन तासांच्या तोफांच्या माऱ्याला तोंड देत, गर्दी त्या प्रचंड मोठ्या तुरुंगावर चालून जाऊ लागली.

दफार्ज ओरडला, "राजवाड्याच्या खंदकावरील पूल पडला. काम करा, मित्रांनो, जॅक्युस दोन, जॅक्युस तीन, जॅक्युस शंभर, जॅक्युस एक हजार मर्दांनो, तुटून पडा."

पण तिथे अजून एक खंदकावरील पूल व आठ उंच मनोरे होते. विजेऱ्यांच्या लखलखाटात व बंदुकींच्या माऱ्यात विजयश्री खेचून आणण्यास, चार तास लागले. बॅस्टीलच्या आत शरण आल्याचा पांढरा ध्वज फडकला आणि दुसऱ्याच क्षणी, दफार्ज आणि वीस हजार जॅक्युस त्या प्रचंड मोठ्या तुरुंगाबाहेरील अंगणात जमले!

ते ओरडले, “कैद्यांना मुक्त करा!”

“कागदपत्रे ताब्यात घ्या.”

“गुप्त कोठ्या शोधून काढा.”

“छळ करणारी यंत्रणा नष्ट करा.”

तुरुंगाच्या एका रक्षकाला पकडून, दफार्जने मागणी केली, “चल, लवकर, मला १०५, उत्तर मनोरा दाखव.”

डोंगरासारख्या मोठ्या अंधारी दगडी पायऱ्या ओलांडत, त्या रक्षकाच्या मागोमाग जात, जॅक्युस तीनसकट तो त्या कोठडीशी पोचला. ती लहानशी, घाणेरडी खोली होती. त्यात एक स्टूल, एक टेबल व एक काड्यांचा पलंग होता. अर्धवट जळलेल्या कार्बनने भिंती काळ्या झाल्या होत्या. शेकोटीशेजारील जागी राखेचा ढीग साचला होता. उंच एका भिंतीत एक छोटीशी खिडकी होती व त्याला लोखंडी गज बसवलेले होते.

दफार्जने रक्षकाला आज्ञा दिली, “तुझ्या हातातील विजेरी सावकाश भिंतीवरून हलव!”

“थांब, जॅक्युस, इकडे पहा. अक्षरे ‘A. M.’! अलेक्झांडर मॅनेट! आणि इथे शब्द आहेत, ‘एक गरीब बिचारा डॉक्टर’ त्वरा करा! जॅक्युस, मला तुझा उचकटायचा लोखंडी दांडा दे!”

दफार्जने ते शस्त्र घेतले. टेबल व स्टुलाचे तुकडे तुकडे केले. नंतर खिडकी व धुराड्यापलीकडील लोखंडावर प्रहार करून, ते खिळखिळे केले. मग त्याच्याकडील चाकूने पलंगाची मोडतोड केली. आणि त्यातील काड्या तपासल्या. त्यात काही न मिळाल्यावर, तो शेकोटीच्या आत रांगत गेला. आणि लोखंडी दांड्याने त्यातील दगड खिळखिळे केले. हाताला कागदांचा गठ्ठा लागेपर्यंत, खुल्या झालेल्या भगदाडात विजेरीने उजेड पाडून, शोधत राहिला.

बॅस्टीलच्या बाहेरील गर्दी सैनिकांना व रक्षकांना गराडा घालून पकडत होते. ते मरेपर्यंत त्यांना मारत होते. बंदुकीच्या गोळया घालत होते व सुरीने जखमा करत होते. काहीजणांना दिव्यांच्या खांबांवर लटकवले होते. काहीजणांची डोकी छाटली होती. एकदा जिथे वाइनचे पिप उलटे झाले होते, तिथे आता रक्तच रक्त सांडले होते. तो रस्ता लाल झाला होता!

बॅस्टील ही लोकांचा राग उसळलेली जागा होती. सबंध फ्रान्समधील तुरुंग आणि राजवाड्यांवर हल्ला करून, ते जाळण्यात आले होते. डोंगरावरील राजवाडे शेंदरी ज्वाळांनी जळत राहिल्याने गावातील काळोख नष्ट झाला होता.

मार्क्विस सेंट एव्हरमॉन्डच्या राजवाड्यातील भिंतीतून, दगड घरंगळत खाली येत होते. ते बघून रस्ते दुरुस्त करणारा हसत होता.

# प्रकरण १२

## धोकादायक प्रवास



"You Have Been Sentenced to Prison!"

ते १७९२ साल होते --- क्रांतीला तीन वर्षे झाली होती. पण तरीही अजून फ्रान्सला राजा व राणी नव्हते. आणि बहुतेक उमराव पळून, इंग्लंडला व इतर देशात जाऊन राहिले होते. फ्रेन्च उमरावांची जमायची आवडती जागा लंडनमधील टेलसन्स बँक ही होती. जसजशी क्रांती जवळ येऊ लागली, तसतसे बऱ्याचजणांनी त्यांचे पैसे व दागदागिने सुरक्षिततेसाठी लंडनच्या टेलसन्स बँकेत ठेवले.

जिथे गोंधळ चालू होता, त्या पॅरीसमधील टेलसन्स बँकेच्या कार्यालयात, अशी भीती पसरली होती, की आक्रमक व आवरता न येणारी गर्दी महत्वाचे कागदपत्र फाडून किंवा जाळून नष्ट करून टाकेल.बँकेचे कागदपत्र व नोंदी लपवलेल्या व सुरक्षित आहेत, हे बघण्यासाठी, लंडनच्या कार्यालयातील कोणीतरी प्रवास करून पॅरीसला येणे भाग होते, कारण फ्रान्समधून ते बाहेर काढणे केवळ मुश्कीलच नव्हे तर अशक्य होते.

जर्व्हीस लॉरीने ती जबाबदारी घेतली.

चार्ल्स डार्ने बँकेच्या अधिकाऱ्यांना म्हणाला, "मी जर्व्हीस लॉरीच्या जागी जाऊ शकतो. विशेषतः थंडीत हा प्रवास लांब आणि धोक्याचा आहे. पॅरीस ही खूप धोक्याची जागा झाली आहे आणि तुम्हाला धोका असू शकेल."

मिस्टर लॉरी नवलपूर्णतेने ओरडले, "मला आणि धोका? नाही, चार्ल्स, तू जन्माने फ्रेन्च असल्याने, उमराव असल्याने आणि तू तुझी जन्मभूमी सोडून

इंग्लंडमध्ये स्थायिक झाल्याने, तुला धोका आहे. कल्पना कर, ल्युसीने तू फ्रान्सला जात असल्याचे ऐकले, तर ती किती घाबरेल!"

'मला वाटले, मी कदाचित आक्रमकता कमी करण्यासाठी क्रांतीकारकांचे मन वळवू शकेन --- "

मिस्टर लॉरी मध्येच बोलले, "चार्ल्स, पुरे झाले. मी जातो आहे. मी आज रात्री निघतो."

"एकटे?"

"मी जेरी क्रंचरला बरोबर घेऊन जातो आहे."

नंतर लगेच मिस्टर लॉरीच्या टेबलाशी बँकेतील ते एक कारकून पत्र घेऊन आला. त्याने ते मिस्टर लॉरीना दिले, तेव्हा चार्ल्सने त्यावर पुढील बाजूला लिहिलेले वाचलेः

***तातडीचे! फ्रान्सच्या मार्क्विस सेंट एव्हरमॉन्ड यांना देणे.***

चार्ल्स पांढरा पडला. लग्नाच्या दिवशी त्याने डॉक्टर मॅनेट यांना त्याचे गुपित सांगितले होते. त्यामुळे त्यानाच फक्त त्याचे खरे नाव माहिती होते. पण ते सोडून, ल्युसी, मिस्टर लॉरी, कुणालाच ते माहिती नव्हते.

मिस्टर लॉरीने पत्राकडे पाहीले व चार्ल्सला स्पष्टीकरण दिले,

"अनेक आठवडे मी मला माहिती असलेल्या फ्रेन्च माणसांना विचारतो आहे, की मार्क्विस सेंट एव्हरमॉन्ड कुठे सापडतील, पण कुणीच मला सांगत नाही आहे,"

चार्ल्स मिस्टर लॉरीकडे वळला व शांतपणे म्हणाला, "मला तो मनुष्य माहिती आहे. मी त्यांना पत्र देतो."

घाईने घरी परत येऊन, चार्ल्सने स्वतःला अभ्यासिकेत बंद केले व पत्र उघडले. ते एव्हरमॉन्ड कुटुंबाची जमीन राखण करणाऱ्या गावातील माणसा कडून, थिओफील गॅबेल याच्याकडून आले होते.त्यात असे लिहिले होतेः

*"आताचा असलेला मालक मार्क्विस,*

*मी माझ्या आयुष्यातील खूप काळ गावातील लोकांपासून असलेल्या भीतीच्या छायेत वावरत आहे. मला पकडून, पॅरीसमधील ॲबीच्या तुरुंगात आणले आहे. माझ्यावर खटला चालवला जाईल व नक्कीच मला मृत्यूची शिक्षा दिली जाईल. माझा गुन्हा काय म्हटला गेला, तर मी तुमच्याकडे कामाला होतो आणि मी लोकांविरुद्ध जाऊन स्वदेशाला फसवण्याचा प्रयत्न करत होतो. तुम्ही त्यांच्या बाजूला असल्याचे सांगायचा मी प्रयत्न केला. तुम्ही मला त्यांच्याकडून कराचे पैसे गोळा न करण्याबद्दल सांगितल्याचेही मी बोललो. तुमच्या काकांनी व वडिलांनी गोळा केलेले पैसेही परत करणार असल्याचे मी बोललो. मी तुम्हाला परत येऊन, मला वाचवण्याची विनंती करतो. मी जसा तुमच्या बाबतीत खरा उतरलो आहे, तसेच तुम्हीही माझ्या पाठीशी उभे रहावे, ही विनंती.*

*तुमचा त्रासलेला नोकर, गॅबेल"*

चार्ल्सने त्याच क्षणी निर्णय घेतला --- तो फ्रान्सला परतेल, फक्त त्याच्या इमानी नोकराला वाचवण्यासाठी नव्हे, तर त्याचे नाव चांगले

राखण्यासाठीदेखील. पण त्याच्या या बेताबद्दल कुणालाच माहिती नव्हते. तो जाईपर्यंत, ल्युसीलाही नाही.

त्या रात्री चार्ल्स उशीरापर्यंत दोन पत्रे लिहित बसला होता. ती त्याच्या प्रवासाबद्दल असून, एक ल्युसीला आणि दुसरे तिच्या वडिलांना लिहिले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी पत्रे वाचली जाईपर्यंत, चार्ल्स गेलेला असणार होता.

चांगल्या काळातही पॅरीसचा प्रवास कठीण होता. फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात तर तो अधिकच धोकादायक होता. प्रत्येक गावी चार्ल्सला देशभक्त नागरिक भेटले. त्यांनी त्यांच्याकडील लांब नळीची बंदूक रोखून, ओळखपत्रांचे कागद मागितले आणि त्यांच्याकडील यादीशी ते ताडून पाहीले. शस्त्रसज्ज देशभक्तांच्या संरक्षणासाठी पैसे दिल्यावरच, शेवटी त्याचा पॅरीसचा मार्ग सुकर झाला.

एका क्रांतीकारकाने मागणी केली, “या कैद्याची कागदपत्रे कुठे आहेत?”

कैदी अशा उल्लेखाने चार्लस, बघत राहीला, पण त्याने त्याचे स्वतःचे कागदपत्र व गॅबेलचे पत्रही दिले. क्षणभराने त्याला खूप सैनिकांची व नागरिकांची गर्दी असलेल्या पहारेकऱ्याच्या चौकीत नेण्यात आले. त्या सर्वांनी लाल टोप्या व क्रांतीचे द्योतक असलेली लाल, पांढरी व निळी पिसे लावली होती.

ऑफिसर पहारेकऱ्याला बोलला, “नागरिक दफार्ज, हा प्रवासी एव्हरमॉन्ड आहे का?”

“हो.”

चार्ल्सकडे वळून ऑफिसरने जाहीर केले, “एव्हरमॉन्ड, तुला ला फोर्सच्या तुरुंगात पाठवण्यात येत आहे!”

“पण मी फ्रान्सला माझ्या इच्छेने परतलो आहे. या आताच तुम्ही वाचलेल्या पत्रात लिहिल्याप्रमाणे, एका फ्रेन्च माणसाला मदत करण्यासाठी मी आलो आहे. मला हे करायचा हक्क नाही का?”

स्वतःची रहाण्याची जागा सोडून दुसरीकडे जाणे, याला परवानगी नाही. आता नागरिक दफार्जच्या मागोमाग जा.!”

एकदा ते बाहेर गेल्यावर, दफार्ज कुजबुजला, “एकदा बॅस्टीलच्या तुरुंगात कैदी असलेले डॉ अलेक्झांडर मॅनेट यांच्या मुलीशी लग्न केलेले तेच तुम्ही का?”

चार्ल्स आश्चर्याने उत्तरला, “हो.”

“माझे नाव अर्नेस्ट दफार्ज आहे व सेंट अँटोनीमध्ये माझे वाइनचे दुकान आहे. कदाचित तुम्ही तुमच्या कुटुंबियांकडून माझे नाव --- “

“हो! माझी बायको तिच्या वडिलांना अनेक वर्षानंतर तुमच्याच दुकानात भेटली होती!”

दफार्ज म्हणाला, “पण मला नवल वाटते, तुम्ही परत पॅरीसला का आलात?”

“मी इथे का आलो, हे तुम्ही मला तुमच्या ऑफिसरला मी सांगितलेले ऐकले आहे. तुमचा माझ्यावर विश्वास नाही का?”

“माझा विश्वास आहे की नाही, हे महत्वाचे नाही.”

“मग मला फक्त माझ्या एका प्रश्नाचे उत्तर द्या --- बाहेरील जगाशी काही संपर्क न साधता, अन्यायकारक रीतीने मी तुरुंगात खितपत पडणार का?”

“कुणास ठाऊक? इतर अनेक लोकांनादेखील अन्यायकारक रीतीने तुरुंगात डांबण्यात आले आहे.”

“पण नागरिक दफार्ज, मला इथे ला फोर्सच्या तुरुंगात डांबण्यात आले असल्याचे, टेलसन्स बँकेच्या मिस्टर लॉरी यांना कळवणे फार महत्वाचे आहे. ते आता पॅरीसमध्ये असलेले सभ्य गृहस्थ आहेत. तुम्ही हा निरोप त्याना पोचवू शकाल का?”

दफार्ज फटकारला, “एव्हरमॉन्ड, मी तुमच्यासाठी काहीही करणार नाही. तुम्ही माझे शत्रू आहात!”

# प्रकरण १३

## डॉ मॅनेट यांचे नवे सामर्थ्य



Dr. Manette Speaks to the Crowd.

पॅरीसमधील टेलसन्स बँकेचे कार्यालय एका मोठ्या घराच्या एका भागात होते. जेव्हा क्रांती झाली, तेव्हा त्या घराचा मालक असलेला उमराव नोकराचे कपडे घालून देश सोडून, पळून गेला.

एका रात्री मिस्टर लॉरी बँकेत उशीरार्यंत काम करत बसले होते,

तेव्हा अचानक ल्युसी व तिचे वडील एकदम खोलीत आले.

मिस्टर लॉरी ओरडले, “तुम्ही पॅरीसमध्ये काय करत आहात? काय झाले आहे?”

जणू आता ती चक्कर येऊन पडणार आहे की काय, अशा अवस्थेत ल्युसी धापा टाकत बोलली, “चार्ल्स इथे आहे.”

मिस्टर लॉरी ओरडले, “नाही, हे खरे नसणार.”

“हो, तो इथे गेले तीन ---नव्हे चार --- दिवस आहे. तो त्याच्या एका जुन्या नोकराला मदत करायला आला. पण त्याला गावाच्या वेशीवरच थांबवण्यात आले आणि ला फोर्सच्या तुरुंगात पाठवण्यात आले.

मिस्टर लॉरी ओरडले, “मग तुम्ही दोघेही धोक्यात आहात.”

डॉ मॅनेट शांतपणे बोलले, “माझ्या प्रिय मित्रा, मला वाटते, या शहरातील कुणीच मला त्रासदायक असे काही करू शकणार नाही. उलट बॅस्टीलच्या तुरुंगातून सुटल्यावर, तिथे अठरा वर्षे हाल काढल्यावर, ते माझे ते स्वागतच करतील. मी काढलेले हलाखीचे दिवस मला चार्ल्सला मदत करायला शक्ती देतील.”

"मग ल्युसी बँकेच्या मागे असलेल्या माझ्या खोलीत जेव्हा विश्रांती घ्यायला जाईल, तेव्हा आपण दोघांनी एकमेकांशी बोलले पाहिजे." आणि मिस्टर लॉरीनी ल्युसीला ती खोली दाखवली.

मग ते दोघेच उरल्यावर, मिस्टर लॉरीनी डॉ मॅनेट यांना खिडकीबाहेरील दृष्य दाखवण्यासाठी नेले. मागील अंगणात दगडांना धार लावायचे एक प्रचंड मशीन होते. दोन नरभक्षक दिसणारी माणसे ते फिरवत होती. त्यांच्या छोट्या कुऱ्हाडी, सुरे व तलवारींना धार लावण्यासाठी, ती चाळीस पन्नास माणसे रानटीपणे मारामारी करत होती. दगडांमधून उडणाऱ्या ठिणग्यांमध्ये त्यांचा घाम व रक्त मिसळले जात होते.

डॉक्टरांनी खिडकीपासून बाजूला होत विचारले, "या सर्वाचा अर्थ काय?"

मिस्टर लॉरी म्हणाले, "ते ला फोर्समधील कैद्यांचा खून करणार आहेत. जर तुमच्याकडे खरोखर शक्ती आहे, असे तुम्हाला वाटत असेल तर, त्या रानटी माणसांमध्ये जाऊन मिसळा आणि त्यांना सांगा की तुम्ही कोण आहात आणि चार्ल्ससाठी मदत मागा! आता आपल्याकडे फार वेळ नाही!"

मिस्टर लॉरींच्या तोंडून हे शब्द बाहेर पडतात न पडतात, तोच डॉक्टर अंगणातील धार लावायच्या मशीनसमोर जाऊन उभे होते. त्यांचे पांढरे केस वाऱ्याने उडत होते. त्यांचे डोळे ठाम निर्धाराने चमकत होते. ते आवेशाने बोलत असतांना, त्यांचे हातही हलत होते.

अचानक गर्दीतून एक आरोळी उठली. "बॅस्टीलचा कैदी चिरायू होवो. त्याचे कुटुंब चिरायू होवो. ला फोर्स तुरुंगामधून एव्हरमॉन्डला वाचवा!"

मग डॉ मॅनेट अग्रभागी असलेली गर्दी पुढे आली व ला फोर्सच्या दिशेने चालू लागली. मिस्टर लॉरी खिडकीतून बाजूला झाले व पुढील लांबलचक रात्रीत ल्युसीला दिलासा देण्यासाठी निघाले.

दुसऱ्या दिवशी सकाळीदेखील डॉ मॅनेट परतले नाहीत, तेव्हा मिस्टर लॉरींनी जवळच ल्युसी, तिची मुलगी आणि मिस प्रॉस यांना आरामात रहाण्यासाठी, एक सदनिका शोधली. मग त्यांनी जेरी क्रंचरला त्यांची देखभाल करायला सांगितले.

मिस्टर लॉरींना दिवसभर बँकेचे काम होते. तरीही डॉ मॅनेट यांची काहीच खुशाली समजली नाही. मग बँक बंद व्हायच्या वेळेनंतर, एक परका माणूस त्यांच्या खोलीत आला. तो बारीक, काळ्या केसांचा माणूस म्हणाला, “मिस्टर लॉरी, तुम्ही मला ओळखले का?”

त्या माणसाने आपल्याला कसे ओळखले, याचे आश्चर्य वाटून घेत मिस्टर लॉरी उत्तरले,”मी तुम्हाला कुठेतरी पाहील्यासारखे वाटते.”

अर्नेस्ट दफार्ज बोलला, “कदाचित माझ्या वाइनच्या दुकानात.”

मिस्टर लॉरींनी डोळे पूर्ण उघडले. त्यांनी उत्सुकतेने विचारले, “तुम्ही डॉ मॅनेटकडून आलात का?”

दफार्जने त्यांना तासाभरापूर्वी डॉक्टरांकडून आणलेली चिठ्ठी दिली. ती अशी होती:

*चार्ल्स सुरक्षित आहे. पण मला अजून ही जागा सोडता येत नाही. ही चिठ्ठी आणणाऱ्याने चार्ल्सकडून त्याच्या बायकोसाठीही चिठ्ठी आणली आहे.”*

चिठ्ठी वाचून झाल्यावर, मिस्टर लॉरी म्हणाले, “मी तुम्हाला त्याच्या बायकोकडे घेऊन जातो.

ते अंगणात गेले, तेव्हा त्यांनी मॅडम दफार्जला धार लावायच्या मशीनसमोर उभे असलेले पाहीले. अनेक वर्षांपूर्वी त्यांनी तिला जसे विणताना पाहीले होते, तसेच ती आतादेखील विणत होती.

दफार्ज बोलला, “माझी बायको आपल्याबरोबर येईल. म्हणजे ती आपण भेटायला जात असलेल्या लोकांना ओळखेल. हे त्यांच्या सुरक्षिततेसाठी आहे.”

मिस्टर लॉरींना याबद्दल थोडा संशय होता, पण त्यांना अधिक उशीर करायचा नव्हता.

जेव्हा मिस्टर लॉरी व दफार्ज सदनिकेशी आले, तेव्हा त्यांना ल्युसी रडतांना दिसली. तिने चार्ल्सकडून तिला आलेली छोटीशी चिठ्ठी वाचली.

*‘प्रिये, धीर धर. मी ठीक आहे. तुझे वडील मला मदत करत आहेत.’*

*छोट्या ल्युसीला माझा पापा सांग.’*

ल्युसी रडत रडत त्यांचे आभार मानण्यासाठी, मिस्टर आणि मिसेस दफार्जकडे वळली. पण मॅडम दफार्जची थंड नजर पाहून, ती क्षणभर घाबरून गेली. जेव्हा ती नजर तिच्या छोट्या मुलीवर व मिस प्रॉसवर पडली, तेव्हा तिची भीती अधिकच वाढली.

मॅडम दफार्ज लबाडीने तिच्या नवऱ्याकडे हसत बघत म्हणाली, “मी त्यांना पाहिले आहे. आता आपण निघू शकतो.”

ला फोर्सहून डॉ मॅनेट चार दिवस परतले नाहीत. त्या काळात अकराशे कैदी रक्तपिपासू झुंडीकडून मारले गेले. त्यावेळीसुद्धा कैद्यांना यमसदनाला पाठवणाऱ्या लोकांच्या, स्वतःच उभारलेल्या कोर्टासमोर, डॉ मॅनेट उभे राहिले व बॅस्टीलमधील त्यांच्या अठरा वर्षांच्या हलाखीच्या तुरुंगवासाबद्दल सांगितले.

त्या झुंडीतील जे लोक प्यायलेले अथवा झोपलेले नव्हते, त्यांनी ते ऐकले. त्यात त्यांच्या गोष्टीला दुजोरा देणारा, अर्नेस्ट दफार्जही होता. कैद्याचे आयुष्य वाचवायचा निर्णय घेण्यात आला. पण चार्ल्सच्या स्वतःच्या सुरक्षिततेसाठी त्याने तुरुंगातच रहावे, असे ठरले.

डॉ मॅनेटनेदेखील तो निर्णय मान्य केला आणि असा विचार केला यामुळे चार्ल्सला बाहेर ओढून काढून, झुंडीकडून मारले जाण्याचा धोका कमी राहील.

चौथ्या दिवशी डॉ मॅनेट ल्युसीला हे सांगण्यासाठी, घरी परतले.

त्यांना मिळालेल्या नवीन प्रसिद्धीमुळे त्यांना ला फोर्सची तपासणी करणारे डॉक्टर असे नाव पडले. तर पुढे येणाऱ्या दिवसात, आठवड्यात व महिन्यात त्यांना चार्ल्सला नेहमी भेटता आले व ल्युसीला तो बरा असल्याचे सांगता आले. पण डॉ मॅनेट चार्ल्सची सुटका करू शकले नाहीत किंवा खटलाही सुरु करू शकले नाहीत. मात्र राजावर खटला झाला आणि लोकांविरुद्ध गुन्हा केल्याने, तो दोषी ठरला. त्याची शिक्षा होती, गिलोटीनने डोके उडवणे. मृत्यूचे ते भयंकर शस्त्र क्रांतीकारकांनी तयार केले होते. त्यात डोके उडवले जाणाऱ्या गुन्हेगारांना लाकडी गाडीतून रस्त्याने वाजत गाजत, गर्दीच्या ठिकाणी जल्लोषात आणले जात असे आणि त्याना मंचावर नेले जात असे. हो,

गिलोटीनमुळे रक्तपिपासू झुंडीला खूप उत्तेजकता मिळाली होती. चार्ल्स त्याचा पुढील बळी ठरणार होता का?

तुरुंगातून परतल्यावर एका संध्याकाळी डॉ मॅनेट यांनी ल्युसीला सांगितले, की ती सर्व प्रकारच्या हवेमध्ये तिच्या मुलीबरोबर जर ठराविक ठिकाणी उभी राहिली, तर तिला चार्ल्सला बघता येईल आणि जरी बघता आले, तरी त्याला हात करणे, धोकादायक ठरेल. तरीही तिला आशा होती, की तो तिला बघेल. ज्या रस्त्यावर ल्युसी रोज उभी रहात असे, तिथे एका लाकूडतोड्याची अंधारी व घाणेरडी झोपडी होती. तो एके काळी रस्ते दुरुस्त करणारा होता. दिवसेंदिवस तिथे ल्युसीला पाहून, त्याने म्हटले, “मॅडम, शुभ दुपार.”

“नागरीका, शुभ दुपार.” क्रांतीकारकांनी नवीन पायंडा पाडलेला शब्द, नागरीक, तिने वापरला.

तो म्हणाला, “मॅडम, तुम्ही रोज इथे येता. त्याच्याशी मला खरे तर काही देणेघेणे नाही. माझे काम आहे लाकूड तासून गिलोटीन बनवणे.”

हे संभाषण रोज चालू झाले. क्रांतीकारकांचे ते नवीन शस्त्र बघून ल्युसीची भीतीने गाळण उडू लागली.

एका बर्फाळ दुपारी, डॉ मॅनेट त्या रस्त्यावर ल्युसीला भेटले व तिला बातमी सांगितली, की चार्ल्सचा खटला उद्या सुरु होणार आहे!

त्यांच्या मागे बर्फातून लाकडी गाड्या येत होत्या. त्यात गिलोटीनकडे चाललेले गुन्हेगार असत.

# प्रकरण १४

# एका हेराने मास्क घातलेला नाही



चार्ल्सच्या खटल्यात, डॉ मॅनेट व थिओफील गॅबेल दोघांची साक्ष घेतली गेली. रक्तपिपासू ज्युरींना ते खात्रीपूर्वक सांगू शकले, की चार्ल्स निर्दोष आहे. सर्वानुमते, त्याला मोकळे सोडण्यात आले.

त्या संध्याकाळी चार्ल्स त्याच्या अतिशय आनंदी कुटुंबाबरोबर शेकोटीशेजारी आराम करत बसला होता, तेव्हा अचानक दारावर जोरजोरात थापा ऐकू आल्या. डॉ मॅनेट कोण आले आहे, हे बघायला उठले.

लाल टोप्या घातलेली, पिस्तुले व तलवारी घेतलेली चार गुंडांसारखी दिसणारी माणसे खोलीत घुसली. त्यातील एकजण ओरडला, “आम्ही डार्ने नावाचा एव्हरमॉन्ड शोधत आहोत. तो परत प्रजासत्ताकाचा कैदी आहे.”

अविश्वासाने गोठून डॉक्टरांनी विचारले, “कुठल्या गुन्ह्याखाली?”

“सेंट अँटोनीमध्ये त्याला शिव्या दिल्या गेल्या.”

“सेंट अँटोनीमध्ये कुणी शिव्या दिल्या?”

“तो चुकीचे वागल्याचे, नागरिक मिस्टर व मिसेस दफार्ज व अजून एका व्यक्तीकडून सांगितले गेले. मी अजून काही सांगू शकत नाही. जेव्हा कैद्यावर खटला चालवला जाईल, तेव्हा उद्या तुम्हाला बाकीचे कळेल. पण आता आम्हाला नागरिक एव्हरमॉन्डला ला फोर्सला न्यावे लागेल.”

अटक होत असतांना जेरी क्रंचर व मिस प्रॉस कुटुंबासाठी काही खरेदी करण्यासाठी बाहेर गेलेले होते. ते घरी परतत असतांना, ते वाइनच्या दुकानात

त्यांच्या शेवटच्या खरेदीसाठी थांबले. त्यांनी दुकानाचे दार उघडताच, मिस प्रॉस जोराने किंचाळली आणि ते ऐकून सर्व गिऱ्हाईके अवाक झाली.

त्यांच्याकडे दुर्लक्ष करत, ती खोलीतून धावत गेली आणि एका बारीक, काळया केसांच्या माणसाला मिठी मारली. ती ओरडली, "सॉलोमन!

माझ्या भावा! इतकी वर्षे झाली, मला तुझ्याकडून काहीच कळले नाही. आणि आता इथे पॅरीसमध्ये तू मला भेटतो आहेस!"

तो घाईने कुजबुजत बोलला. "मला सॉलोमन म्हणू नकोस. तुला मी मरायला हवा आहे का? आपण बाहेर बोलू."

मिस प्रॉस त्या माणसापाठोपाठ दाराबाहेर गेली. जेरी एक पाऊल तिच्या मागे होता.

तिच्या गालावर कर्तव्यतत्परतेने चुंबन घेत तो माणूस बोलला, "तू पॅरीसमध्ये असल्याचे मला माहिती होते. पण तू तुझ्या मार्गाने व मी माझ्या मार्गाने, गेलेले बरे! मी मान असलेला तुरुंग अधिकारी आहे."

"तुरुंग अधिकारी? परक्या देशात? सॉलोमन, मला तुझी लाज वाटते!"

सॉलोमनने फटकारले, "बास झाले. अशा बोलण्याने माझ्यावर संशय घेतला जाईल. मला मारलेही जाऊ शकेल!"

जेरी क्रंचर मध्येच बोलला, "एक मिनिट! तू इंग्लंडमध्ये असतांना सॉलोमन हे नाव वापरत नव्हतास. आता मी तुला ओळखले. जुन्या बेलेमध्ये चार्ल्स डार्नेच्या खटल्यात तू साक्षीदार होतास. तू म्हणालास, तुझे नाव जॉन --- "

एक आवाज अंधारातून बोलला, “जॉन बर्साद!” हे बोलणारा जवळ सरकला. तो सिडने कार्टन होता. सिडने बोलला, “मिस प्रॉस, घाबरू नका. पण मला तुम्हाला काही सांगायचे वाईट काम करायचे आहे, की तुमचा भाऊ तुरुंग हेर बनला आहे.”

चेहरा पाडत, भाऊ बोलला, “तुला माझ्याबद्दल काय माहिती आहे?”

सिडने बोलला, “मी तासाभरापूर्वी तुरुंगाच्या भिंतीजवळून चाललो होतो, तेव्हा मी तुला बाहेर येतांना पाहिले. चेहरे माझ्या चांगले लक्षात रहातात. विशेषतः माझ्या एका जवळच्या मित्राच्या दुर्दैवाच्या बाबतीत संबंध असलेला तुझा चेहरा माझ्या चांगला लक्षात आहे. मी वाइनच्या दुकानापर्यंत तुझा पाठलाग केला. तिथे मी तुझे तुझ्या मित्राबरोबर चाललेले संभाषण ऐकले. तेव्हा माझ्या लक्षात आले, की तुझा खरा व्यवसाय --- आहे आणि मला अचानक कळले, की तू माझे एक काम करू शकतोस.”

हेराने विचारले, “काय काम?”

सिडने म्हणाला, “त्याबद्दल आपण इथे बोलणे योग्य नाही. आपण तुझ्या बहिणीला घरी पोचवू आणि मग मिस्टर क्रंचरबरोबर मिस्टर लॉरी यांच्या खासगी कार्यालयात बसून, थोडेसे बोलू.”

ओळखले जाण्याचा धोका न घेता, त्याला हे न करणे शक्य नसल्याचे समजून, सॉलोमन प्रॉस उर्फ जॉन बर्साद तयार झाला.

तीन लोक आले, तेव्हा जर्व्हीस लॉरी शेकोटीशेजारी आराम करत होता. जेव्हा त्याने त्यांच्याबरोबर जॉन बर्सादला पाहिले, तेव्हा त्याचे सिडने आणि जेरीसाठीचे स्वागतपर हसू गोठले.

सिडनेने स्पष्टीकरण दिले, "मिस्टर बर्साद म्हणजे मिस प्रॉसने ज्याच्यावर उगीचच नको इतके प्रेम केले तो तिचा भाऊ! त्याने एकदा तिचे

पैसे लंपास करून तिला कफल्लक बनवले. पण ते काही आता महत्वाचे नाही. माझ्याकडे दुसरी बातमी आहे --- चार्ल्सला पुन्हा अटक झाली आहे!

मिस्टर लॉरी ओरडले, "मी त्याला थोड्या वेळापूर्वी त्याच्या कुटुंबाबरोबर पाहीले.

सिडने म्हणाला, "मिस्टर बर्सादला त्याच्या एका मित्र हेराकडून वाइनची बाटली मिळाली, त्या बदल्यात त्याने सांगितले, की चार्ल्सला अटक झाली. पण मिस्टर लॉरी, मला कसला त्रास होतो, तर डॉ मॅनेट त्यांची शक्ती वापरून, ही अटक रोखू शकले नाहीत. उद्यासुद्धा जेव्हा चार्ल्सचा खटला उभा राहील, तेव्हा कदाचित ते काही करू शकणार नाहीत. त्यामुळे मला मदतीसाठी दुसऱ्या कोणावर तरी अवलंबून रहावे लागणार आहे. कुणी तुरुंगहेर? --- तू, मिस्टर बर्साद!"

बर्साद किंचाळला, "आणि मी तुला मदत करायला नकार दिला तर? तू मला हे करण्यासाठी बळजबरी करू शकत नाहीस."

सिडने फसव्या तऱ्हेने हसत बोलला, "तुला बळजबरी? असे क्वचितच होईल! आता तुला फ्रेंच प्रजासत्ताक पगार देते आहे आणि एके काळी तू इंग्लिश सरकारच्या सेवेत होतास. तू अजूनही इंग्लंडसाठी हेरगिरी करत नाहीस, असे कोण म्हणेल? एके काळी इंग्लंडमध्ये तुझे एक नाव होते आणि आता फ्रान्समध्ये तू वेगळ्या नावाने वावरतोस. मी जर तुला सेंट अँटोनीच्या क्रांतीकारक मंडळासमोर लबाड असल्याचे जाहीर केले तर? नाही मिस्टर बर्साद, मी तुला काहीही करायला भाग पाडू शकत नाही."

जॉन बर्साद, थरथरत, खुर्चीत मागे पडला. तो फ्रान्समध्ये हेरगिरी करत होता. पहील्यांदा इंग्लिश लोकांमध्ये आणि नंतर फ्रेंच लोकांमध्ये. क्रांतीपूर्वी, तो फ्रेंच राजाच्या पदरी सेंट अँटोनीच्या लोकांवर हेरगिरी करत होता. त्याने मॅडम दफार्जला, तिच्या नवऱ्याच्या वाइनच्या दुकानात सतत विणतांना पाहिले होते आणि तिने ज्यांची नावे विणली होती, त्याना गिलोटीनने मरतांना पाहिले होते.

त्या हेराचा विचार डोक्यातून काढून टाकत व पुढचे बेत आखत, सिडने बोलला, "तसेही तू वाइनच्या दुकानाच्या आधी त्या कुठल्या हेराबद्दल बोलत होतास?"

बर्सादने झटपट उत्तर दिले, "तो फ्रेंच आहे. तुला तो माहिती नाही."

"तो फ्रेंच चांगले बोलतो, पण फ्रेंच लोकांसारखे नाही. मला माहिती आहे --- तो रॉजर क्लाय होता! त्याने वेष बदलला होता, पण मी त्याला ओळखले. तो देखील बॅलेच्या जुन्या खटल्यात होता."

बर्साद फसवे हसू हसत बोलला, "आता मात्र तू अती करतो आहेस. रॉजर क्लाय एके काळी माझा भागीदार होता. तो वारल्याला अनेक वर्षे झाली. खरे तर मी त्याला त्याच्या कॉफिनमध्ये ठेवायला मदत केली! मी त्याच्या मरण प्रमाणपत्राची प्रत माझ्याकडे बाळगत होतो!" आणि त्याने खिशातून एक कागद काढला.

अचानक, एक उल्लेखनीय गोष्ट झाली.

जेरी क्रंचर त्याच्या खुर्चीतून उठला. त्याच्या डोक्यावरील प्रत्येक केस उभा राहिला होता आणि त्याचा चेहरा आक्रमक दिसत होता. तो जोराने गुरगुरला, "म्हणजे तू क्लायला कॉफिनमध्ये ठेवलेस?"

बर्साद ठामपणे बोलला, "हो, मी ते केले."

"मग त्याला त्यातून बाहेर कुणी काढले? त्या कॉफिनमध्ये फक्त चपटे दगड होते."

बर्साद ओरडला, "हे तुम्हाला कसे कळले?"

जेरी गुरगुरला, "कसे कळले, त्याचे एवढे काही नाही, पण ते खरे होते!"

आता सिडने कार्टन त्यांच्यात मिसळला. "म्हणजे इंग्लिश सरकारसाठी काम करणाऱ्या दुसऱ्या हेराबरोबर तुझे संबंध होते म्हणून, सेंट अँटोनीमधील तुलाही दोष दिला जाऊ शकतो. जेव्हा तो हेर मेल्याचे ढोंग करेल आणि मग परत जिवंत होईल, तेव्हा हे अजून संशयास्पद दिसेल!"

जॉन बर्सादने पाहिले की तो पकडला गेला आहे. तो बोलला, "मी हे कबूल करतो. "मला रस्त्यावर मरणाला सामोरे जाण्याखेरीज, इंग्लंडबाहेर पडणे शक्य झाले नसते आणि रॉजर क्लायला मरायचे ढोंग करणे! एवढाच

निसटायचा उपाय शिल्लक राहिला होता. पण मला हे कधीच समजणार नाही, की या माणसाला कॉफिन आणि क्लायच्या प्रेताबद्दल कसे काय समजले!”

सिडनेने चपराक लगावली, “त्याचा विचार करू नकोस! मी आता तुला जे करायला सांगेन, ते तू करशील का?”

बर्साद बचाव करत बोलला, “मला काही अती करायला सांगू नकोस. माझ्या हातात फार अधिकार नाहीत --- मी ला फोर्स तुरुंगात फक्त पहारेकरी आहे.”

सिडने आग्रह धरत बोलला, “मला फक्त एक गोष्ट माहिती करून घ्यायची आहे. तू पहारा देतोस तेथील कोठडीच्या किल्ल्या तुझ्याकडे असतात का?”

“हो.”

“मग मला तुझ्याशी खासगीत काही बोलावे लागेल!”

एवढे बोलून, त्या दोघांनी खोली सोडली.

जॉन बर्साद जेव्हा त्याच्या हेरगिरीच्या व तुरुंगरक्षकाच्या कामावर ला फोर्समध्ये व सिडने कार्टन मिस्टर लॉरीच्या खोलीत परतला, तेव्हा मिस्टर लॉरीने त्याला विचारले, की त्याने बर्साद बरोबर काय ठरवले आहे.

“फक्त एवढेच, की जर चार्ल्सबरोबर काही वेडेवाकडे झाले, तर मी त्याला एकदा शेवटचे भेटेन.”

मिस्टर लॉरी ओरडले, “एवढेच? त्याला एकदा भेटून त्याचे मरण काही टळणार नाही!”

“मला माहिती आहे, पण तुम्ही किंवा डॉ मॅनेट अजून काही करू शकत नाही. सर, मी काय बेत करतो आहे, हे मला कृपया विचारू नका. मी जे काही चांगले करेन, त्यामुळे मी जे बेकार आयुष्य जगतो आहे, त्यात काही फरक पडणार नाही. माझ्या आयुष्यात माझ्यावर प्रेम करणारे, मला मान देणारे, कुणी नव्हते किंवा मी मरेन, तेव्हा माझ्यासाठी शोक करणारे कुणी नसेल. मी या पृथ्वीवर जन्मल्यापासून कुणासाठी काहीही चांगले केलेले नाही. कदाचित आता --- “

हे विचित्र शब्द ऐकून, मिस्टर लॉरी कोड्यात पडले. पण दुसऱ्या दिवशी सकाळी कोर्टात त्याची भेट घेण्यास तयार झाले.

एकदा मिस्टर लॉरीच्या खोलीतून बाहेर पडल्यावर, सिडने खूप लांब चालत एका केमिस्टच्या दुकानात गेला. तिथे त्याने दोन बाटल्या पातळ औषध विकत घेतले.


तेथील दुकानदार म्हणाला, “त्या दोन बाटल्या एकत्र केल्या, तर ते फार परिणामकारक औषध ठरेल. ते काळजीपूर्वक वापरा.”

सिडनेने मान हलवली व बाहेर पडला. ‘आता उद्यापर्यंत करण्यासारखे काही नाही.’ तो स्वतःशी पुटपुटला.

रात्रभर रस्त्यातून भटकून, पहाटे अंघोळ करून कपडे करण्यासाठी, सिडने त्याच्या खोलीवर आला. नेहमीच्या वाइनच्या न्याहारीपेक्षा वेगळे असे त्याने पाव व कॉफी घेतली. मग चार्ल्स डार्नेच्या खटल्याची सुनावणी ऐकण्यासाठी कोर्टात गेला.

# प्रकरण १५

# दुर्दैव



Forced To Enter a Carriage

‘डार्ने म्हणून माहिती असलेला, चार्ल्स सेंट एव्हरमॉन्ड’ असा पुकारा कोर्टातील सरकारी माणसाने केला. ‘मुक्त करून, परत अटक केलेला, लोकशाहीचा शत्रू असलेला, उमराव आणि लोकांना छळणाऱ्या व त्यांचे रक्त ओरबाडणाऱ्या कुटुंबातील सदस्य”

ज्युरींच्या मंडळाने विचारले, “कैद्यावर हा आरोप कुणी केला आहे?”

“तीन लोकांनी. सेंट अँटोनीमधील वाइनच्या दुकानाचा मालक अर्नेस्ट दफार्ज.”

“अजून कोण?”

“थेरेसा दफार्ज, त्याची बायको.”

“अजून कोण?”

“एक डॉक्टर अलेक्झांडर मॅनेट!”

कोर्टात एकदम गलका झाला. अशक्त आणि थरथरणारे डॉ मॅनेट मटकन त्यांच्या खुर्चीत बसले.

अर्नेस्ट दफार्जला साक्षीदाराच्या पिंजऱ्यात बोलावण्यात आले. त्याने त्याच्या तरुणपणी तो डॉ मॅनेट यांच्याकडे काम करत असल्याबद्दल सांगितले. बॅस्टीलच्या तुरुंगातून डॉक्टरांची सुटका झाल्यावर त्यांच्या घरी त्यांना थारा दिला असल्याचेही तो म्हणाला. अध्यक्षाने विचारले, “बॅस्टीलचा तुरुंग लोकांच्या हातात आल्या दिवसापासून, तू काय केलेस?”

“मी तुरुंग अधीक्षकाला मला आणि आता ज्युरीमध्ये बसलेल्या एका नागरिकाला, जिथे डॉ मॅनेट कैदी म्हणून रहात होते तिथे, १०५, उत्तर मनोऱ्याला, घेऊन जायची आज्ञा दिली. त्या खोलीतील धुराड्यातील दगडांच्या मागे असलेल्या भोकात, मला हा डॉक्टरांच्या हस्ताक्षरातील कागद सापडला.

अध्यक्षाने तो कागद वाचला. तो असा होताः

*मी अलेक्झांडर मॅनेट माझ्या बॅस्टीलमधील तुरुंगातील खोलीतून डिसेंबर १७६७ मध्ये, अतिशय दुःखाने ही चिठ्ठी लिहित आहे. मी ती धुराड्यातील दगडांच्या मागे असलेल्या भोकात लपवेन. मला अशी आशा आहे, की कुणी दयाळू इसमाला माझ्या मरणानंतर ती सापडेल. मी माझ्या तुरुंगवासाच्या दहाव्या वर्षी, मला आता सुटकेची कुठलीही आशा उरलेली नसतांना लिहित आहे. मला अशी भीती आहे की लवकरच माझा मनावरील ताबा जाणार आहे. पण आता माझे डोके पूर्णपणे शाबूत आहे. माझी गोष्ट खरी असल्याचे मी शपथपूर्वक सांगतो.*

*२२ डिसेंबर १७५७ या दिवशी, मी माझ्या घराजवळ चालत होतो, तेव्हा एक गाडी माझ्याजवळ येऊन थांबली. त्यातून मला मारलेली हाक मला ऐकू आली. दोन जुळे भाऊ --- ते माझ्या नंतर लक्षात आले --- गाडीतून बाहेर आले. त्यांनी बुरखे पांघरलेले होते व त्यांच्याकडे हत्यारे होती. त्यांनी मला नम्रपणे पण ठामपणे गाडीत चढायला सांगितले आणि मी निःशस्त्र असल्याने मला त्यांचे ऐकावेच लागले. मला गावातील सुनसान रस्त्यावर नेण्यात आले. तिथे मेंदूचा ज्वर झालेली एक सुंदर बाई अंथरुणावर पडलेली होती. तिच्या*

*विसंगत बडबडीवरुन, असे दिसले, की ती स्वतःला मारायला निघाली होती. त्यापासून तिला वाचवण्यासाठी, तिचे हात तिच्या बाजूंना एका सभ्य गृहस्थाच्या कपाटातील रुमालाने बांधून ठेवले होते. त्यावर E असे एका प्रतिष्ठीत कुटुंबाचे आद्याक्षर दिसत होते.*

*ती रोगी बाई ओरडत होती. "माझा नवरा, माझे वडील, माझा भाऊ! मग ती बारापर्यंत आकडे मोजे व हुश्श करे." मी त्या रात्री फिरायला जातांना, माझी औषधांची बॅग घरी राहिली असल्याने, त्या दोन भावांनी मला त्या बाईला शांत करण्यासाठी काही औषधे दिली.*

*मी त्या जुळ्या भावांपैकी एकाला विचारले, तिला नवरा, वडील व भाऊ आहेत का?*

*तो उत्तरला, "एक भाऊ आहे. तो देखील रोगी असून, त्यालादेखील तुम्ही बघावे. त्याने मला तबेल्यातील एका माळ्यावर नेले. तिथे मला साधारण सतरा वर्षांचा एक देखणा शेतकरी मुलगा, गवतात पडलेला दिसला.*

*त्या मुलाला चाकूने प्राणांतिक जखम झाली होती. तो कळ येत असल्याने, त्याचे दात दाबत होता, व तो मला ती जखम तपासून देत नव्हता. तसेही त्याचे आयुष्य वाचवायला फार उशीर झाला होता.*

*त्या दोन जुळ्यांपैकी लहानाला मी विचारले, "हा काय प्रकार आहे?"*

*तो फटकारला, "रस्त्यावरील मूर्ख सर्वसाधारण कुत्रा. एक गुलाम! त्याने माझ्या भावाला त्याला चाकू खुपसायला लावला."*

*मुलगा त्याची शक्ती गोळा करून बोलला, "हे उमराव आपल्याला लुटतात, मारझोड करतात आणि ठार मारतात." त्याला मरण्यापूर्वी त्याची गोष्ट सांगायची होती. "पण आपल्याला आपला अभिमान आहे. डॉक्टर, तुम्ही माझ्या बहिणीला पाहिले का?"*

*मी उत्तरलो, "हो."*

*"ती चांगली मुलगी होती. तिचे एका छान तरूणाशी लग्न ठरले होते. तो तरुण या दोघांचा भाडेकरू होता. आम्ही सगळेच भाडेकरू होतो. जवळ जवळ गुलामच होतो. ते आम्हाला कर भरायला लावत. पगार न देता राबवून घेत. आमची पिके त्यांच्या गुरांना देत आणि आम्हाला जेमतेम आम्ही जगू, एवढेच खायला देत. पण याहून वाईट म्हणजे, ते आमच्यातील तरुण स्त्रियांना उपभोग घेण्यासाठी वापरत.*

*माझ्या बहिणीचे लग्न झाल्यावर लगेच त्या माणसाच्या जुळ्या भावाने तिच्या नवऱ्याला आज्ञा दिली, की काही काळाकरता त्याने तिला त्याला द्यावे. पण माझी बहीण त्याच्याबरोबर जायला तयार होईना. आणि तिच्या नवऱ्याने तिला तसे करायला भाग पाडायला नकार दिला. तेव्हा त्या माणसाने तिच्या नवऱ्याला पशुसारखे गाडीला जुंपले आणि दिवसेंदिवस त्याला चाबकाने झोडपत, त्याच्या इस्टेटीमधून फिरवू लागला. शेवटी एकदाचे त्याच्या मानेवरील जू काढले गेले, तेव्हा एक दिवस दुपारी त्याने खाण्याकरता, --- प्रत्येक घंटेच्या एका ठोक्याला एक अशी हुंदके देत, बारा वेळा मागणी केली आणि मग पडून, माझ्या बहिणीच्या बाहुपाशात मेला.*

*मग त्या माणसाच्या भावाने माझ्या बहिणीला त्याच्या उपभोगासाठी नेले. हे मी माझ्या वडिलांना सांगितल्यावर त्यांचे हृदय विदीर्ण झाले. लगेच मी माझ्या दुसऱ्या बहिणीला --- कारण मला ती होती --- त्या माणसाच्या पकडीपासून दूर नेले. काल रात्री मला जुळ्यातील मोठा भाऊ इथे सापडला. त्याच्या खिडकीवर मी हातात तलवार घेऊन चढलो. तो माझ्या अंगावर चाबूक घेऊन धावला आणि माझी बहीण माझ्याकडे धावली. त्याला मी मारेपर्यंत माझ्याकडे येऊ नकोस, असे मी तिला म्हणालो.*

*मी त्याला तलवार काढायला लावली. "डॉक्टर, मला आता उचला. मला त्या पापी माणसाला बघू द्या."*

*मी त्याला माझ्या हातात उचलले. तो जुळ्यांमधील लहान भावाकडे वळला आणि बोलला, "मार्क्विस, जेव्हा वेळ येईल, तेव्हा तुझ्या पापांना चांगला धडा शिकवला जाईल. मी तुला आणि तुझ्या भावाला तुमच्या दुष्कृत्यांसाठी तेव्हा उत्तर द्यायला लावतो. त्यासाठी मी हा माझ्या रक्ताचा क्रॉस तुम्हाला खूण म्हणून लावतो."*

*त्या मरणाऱ्या मुलाने त्याचा हात त्याच्या जखमेवर ठेवला आणि त्याच्या रक्ताळलेल्या पुढील बोटाने, हवेत एक क्रॉस काढला. मग त्याचे बोट पडले. त्याचे अंग लुळे पडले आणि तो मरून पडला ---*

*जेव्हा मी घरी परतलो, तेव्हा मला त्या भयंकर गुप्त गोष्टीचे ओझे उतरून ठेवावे लागले. मी राजाच्या दरबारातील मंत्र्याला काय झाले त्याचे स्पष्टीकरण देणारे पत्र लिहायचे ठरवले.*

*मी पत्र लिहून संपवतो, तोच एक आजारी व उदास दिसणारी सुंदर तरुण स्त्री माझ्या दाराशी आली. ती म्हणाली, ती मार्क्विस एव्हरमॉन्डची बायको आहे. मरणाऱ्या मुलाने जुळ्या भावांपैकी एकाचा व रुमालावरील E चा उल्लेख केला होता, त्याच्याशी मी तिच्या नावाचा संबंध जोडला.*

*त्या बाईने मी नुकत्याच लिहिलेल्या गोष्टीतील तिच्या नवऱ्याच्या सहभागाचा शोध लावला होता. तिला मेलेल्या मुलीबद्दल सहानुभूती वाटली. तिला मुलीच्या कुटुंबांला नुसती मदतच करायची नव्हती, तर फ्रान्सच्या लोकांच्या मनात असलेला एव्हरमॉन्ड कुटुंबावरील रागही घालवायचा होता. तिला लहान बहीणीलाही भेटायचे होते. पण मी तिला तिचे नाव व पत्ता सांगू शकलो नाही, कारण जखमी मुलाने तो मरण्यापूर्वी सांगितला नव्हता. त्या बाईबरोबर एक छान मूल होते. तो २/३ वर्षांचा मुलगा होता.*

*ती गयावया करत बोलली, "डॉक्टर, निदान छोट्या चार्ल्ससाठी तरी! मी माझ्या नवऱ्याच्या पापांची भरपाई करायला तयार आहे. कारण जर मी असे केले नाही, तर मला भीती वाटते, की एक दिवस कदाचित चार्ल्सला त्याच्या वडीलांच्या गुन्ह्यांसाठी शिक्षा होईल. या जगात माझे असे काय राहिले आहे --- फक्त काही रत्ने --- जर त्या मुलीचा पत्ता मिळाला, तर मी ती तिच्या कुटुंबाला देऊन टाकेन."*

*ती गेल्यावर मी माझे पत्र राजाच्या दरबारात दिले. त्या ३१ डिसेंबरच्या रात्री, एका काळ्या कपड्यातील माणसाने माझे दार वाजवले व माझ्या तरुण नोकराला, अर्नेस्ट दफार्जला सांगितले, की तिथे वैद्यकीय आपत्कालीनता*

*उद्धवली आहे आणि त्याने मला तिथे नेण्याकरता गाडी आणली आहे. अर्नेस्टने मला हे सांगितले आणि मी निघालो.*


*मी घराबाहेर पडतो की नाही, तोच काळ्या कपड्यातील माणसाने माझ्या तोंडाला काळा मफलर बांधला आणि माझे हात कडेला बांधून टाकले. एव्हरमॉन्ड भाऊ अंधारी कोपऱ्यातून पळाले आणि मान वळवून त्यांनी मला ओळखले. त्यांच्यापैकी एकाने मी राजाच्या दरबारात देण्यासाठी लिहिलेले लिहिलेले पत्र धरले होते.*

*गाडीने मला बॅस्टील येथे --- माझ्या जिवंत स्मशानात आणले. या सगळ्या वर्षांमध्ये त्या भावांनी एवढी बातमीही आणली नाही, की माझी प्रिय पत्नी मेली, की जिवंत आहे. यासाठी मी त्यांना व त्यांच्या वारसांना --- त्यांच्या शेवटच्या वंशापर्यंतच्या पिढीला जाहीर रीत्या पापी ठरवले. मी डॉ अलेक्झांडर मॅनेट, दुःखी कैदी या १७६७ च्या शेवटच्या रात्री, त्याना सर्व लोकांसमोर पापी ठरवतो आणि एक ना एक दिवस त्यांना याचा जाब द्यावाच लागेल, असे समजतो."*

जेव्हा अध्यक्षाने वाचून संपवले, तेव्हा कोर्टात भली मोठी आरोळी उठली. ज्युरींचा निर्णय पूर्वीपेक्षा वेगळा, ठामपणे चार्ल्स डार्नेच्या विरुद्ध होता. चोवीस तासाच्या आत गिलोटीनने मरण!

# प्रकरण १६

# नशीबवान भेट



“Farewell, My Love. . . .”

सिडने कार्टनने डॉ अलेक्झांडर मॅनेट व ल्युसीला कोर्टातून घरी नेले. त्यांना मिस्टर लॉरी आणि मिस प्रॉसच्या ताब्यात दिले आणि सेंट अँटोनीमधील अर्नेस्ट दफार्जच्या वाइनच्या दुकानाकडे चालू लागला.

मॅडम दफार्जने त्या इंग्लिश माणसाला हवी ती वाइन दिली आणि त्याचे फ्रेंच मधील बोलणे [ सिडने ती भाषा चांगली बोलायचा. ] ऐकले. तिने तिच्या नवऱ्याला म्हटले, की सिडने किती चार्ल्स एव्हरमॉन्डसारखा दिसतो!

दफार्जने सिडनेकडे पाहिले, त्याच्या बायकोकडे बघून मान हलवली आणि मग दुसऱ्या गिऱ्हाईकाबरोबरील --- जॅक्युस ३ याच्या बरोबरील संभाषणात सामील झाला. दफार्ज मोठ्याने बोलला, “आपण कुठेतरी थांबले पाहीजे. टेबलावरील इंग्लिश लोकांना त्याचे फ्रेन्चमधील बोलणे कळले नसणार, याबद्दल त्याला खात्री होती.

त्याची बायको किंचाळली, “आपण गुन्हेगारांना फाशी देण्यापासून वाचवू शकत नाही.”

जॅक्युसने दुजोरा दिला, “फाशी ही चांगली गोष्ट आहे. आपल्या शत्रूंना मरण दिलेच पाहीजे.”

दफार्ज बोलला, “पण डॉ मॅनेट यांनी आणि त्यांच्या मुलीने आधीच इतका त्रास काढला आहे.”

मॅडम दफार्जने तक्रार करत म्हटले, “जर हे तुझ्यावर सोडले, तर तू अजूनही कैद्याला वाचवायचा प्रयत्न करू शकतोस. पण मी एव्हरमॉन्ड

कुटुंबाला माझ्या बऱ्याच काळापूर्वी माझ्या यादीत टाकलेले आहे. त्या सर्वांना मारले पाहिजे. ल्युसी व तिच्या मुलीलाही.

जॅक्युस ३ ने विचारले, "मॅडम, बायको आणि मुलीबद्दल इतक्या कटू भावना तुमच्या मनात का आहेत?"

"जॅक्युस, जेव्हा बॅस्टील पडले, तेव्हा उत्तर मनोऱ्यात माझ्या नवऱ्याला तो कागद सापडला आणि डॉ मॅनेटची गोष्ट आम्ही दोघांनी एकत्र वाचली. तू बघतो आहेस, माझी प्रतिक्रिया भयंकर होती. त्यात वर्णन केलेले शेतकरी कुटुंब हे माझे कुटुंब होते. आक्रमकपणे मारला गेलेला मुलगा माझा भाऊ होता. ती बलात्कार केली गेलेली, मेंदूच्या ज्वराने पिडीत मुलगी, माझी बहीण होती. हृदयभग्न झालेले त्यांचे वडील माझे वडील होते. त्या कुटुंबातील वाचलेली एकमेव मुलगी मी आहे. एव्हरमॉन्ड कुटुंबाच्या कृष्णकृत्यांचा सूड घेणारी मी एकटीच मागे उरले आहे. त्यामुळे ती माझी जबाबदारी आहे."

वाइनच्या दुकानात इतर गिऱ्हाईक आले आणि संभाषण बंद झाले.

सिडनेच्या कानावर खूप काही पडले होते. आता ल्युसी आणि तिची मुलगी पण धोक्यात होते. त्याला लवकर काही करायला हवे होते. दुकानाबाहेर पडून, तो मिस्टर लॉरींच्या खोलीवर ठरल्याप्रमाणे नऊ वाजता त्यांना व डॉ मॅनेटना भेटायला निघाला. पण रात्री बाराचे ठोके पडेपर्यंत, म्हातारे डॉ मॅनेट दाराशी आले नाहीत. त्यांचा चेहरा बघून सिडने व मिस्टर लॉरींना कळत होते, की सर्व काही संपले आहे!

त्यांच्या केसातून रानटीपणे हात फिरवत, डॉक्टर ओरडले, “मला ते सापडत नाही. ते कुठे आहे? मला माझे चांभाराचे बाक व हत्यारे हवी आहेत.”

सर्व काही संपले आहे! पूर्णपणे संपले आहे!

त्या दोघांनी विलाप करणाऱ्या डॉक्टरांना शांत केले आणि खात्री दिली, की लवकरच त्यांना हत्यारे मिळतील. नंतर सिडनेने खिशातून कागदाचा एक तुकडा काढला व नंतर डॉक्टरांच्या खिशातून तसाच कागद काढेपर्यंत शोधाशोध केली. ते दोन्ही कागद मिस्टर लॉरींना देऊन, स्पष्ट केले, “हे प्रवासाचे कागद ल्युसी, तिची मुलगी, डॉ मॅनेट व मी या सर्वांना पॅरीस सोडण्याची परवानगी देतील. हे माझ्यासाठी उद्यापर्यंत सांभाळून ठेवा. कारण मी तुरुंगात जाईन, तेव्हा मला ते माझ्याबरोबर नको आहेत. तुम्ही व मी इंग्लिश माणसे आहोत आणि आपण सुरक्षितपणे पॅरीस सोडू शकू. पण मला असे वाटते आहे, की आपण घाई केली नाही, तर त्यांच्या प्रवासाची परवानगी रद्द होईल.”

मिस्टर लॉरींनी विचारले, “ते धोक्यात आहेत का?”

“सर, फक्त आज रात्री खूपच धोक्यात आहेत. मी असे ऐकले आहे की मॅडम दफार्जचे बेत त्यांना लोकांसमोर गुन्हेगार ठरवण्याचे आहेत. पण मिस्टर लॉरी, तुम्ही त्यांना वाचवू शकता.”

“मी त्यांच्यासाठी काहीही करेन.”

“उद्या दुपारी दोन वाजता पॅरीस सोडण्यासाठी गाडी तयार ठेवा. ल्युसीला धोका असल्याचे सांगा आणि तिच्या मुलीसाठी व वडिलांसाठी, तिने तुमच्याबरोबरच जायला पाहीजे. तिला सांगा की ही तिच्या नवऱ्याची शेवटची

इच्छा आहे. त्या सर्वांबरोबर तुम्ही गाडीत रहा आणि माझ्यासाठी जागा ठेवा. मी आलो की लगेच, मला आत ओढून घ्या व गाडी धावडवा. तुमच्याबरोबर प्रवासासाठी लागणारे कागद असल्याची खात्री करा, म्हणजे आपल्याला बिनघोर इंग्लंडला जाता येईल. आणि काही झाले, तरी तुमचा बेत बदलू नका!"

सिडनेचा हात हातात घेऊन, जर्व्हीस लॉरी बोलला, "त्यांना मदत करणारा, तू चांगला माणूस आहेस. तू म्हणतो आहेस, तसेच मी करेन."

नंतर त्या दोघांनी म्हाताऱ्या डॉक्टरांना घरी सोडले व नंतर अंधारात सिडने रस्त्यावर ल्युसीच्या उजेड असलेल्या खिडकीकडे बघत उभा राहीला. तो कुजबुजला, "देव तुझे भले करो. माझ्या प्रेमा, बाय बाय --- "

सिडने जेव्हा त्याचे बेत करत होता, तेव्हा तुरुंगातील त्याच्या खोलीत चार्ल्स एकटाच होता. तो त्याची शेवटची पत्रे लिहित होता. त्याने ल्युसीवरील त्याच्या प्रेमाची खात्री देत, तिला तिच्या वडिलांसाठी बळकट रहाण्याचे सुचवले. त्याने डॉ मॅनेट यांना त्याच्या बायकोची व मुलीची काळजी घेण्यास सांगितले व मिस्टर लॉरी यांचे त्यांच्या मित्रत्वाबद्दल आभार मानले व त्यांच्या कामे करण्याच्या पद्धतीवर पूर्ण विश्वास असल्याचे सांगितले. त्याच्या शेवटच्या काही तासात त्याने सिडने कार्टनबद्दल काहीही विचार केला नाही.

घड्याळाने दोनचे टोले दिले. अजून तासाभरात कैद्याला लाकडी गाडीत घालून, ओढत गिलोटीनवर घालण्यासाठी नेणार होते.

अचानक कुलुपात किल्ली फिरली आणि तुरुंग अधिक्षकाने दार उघडले. सिडने कार्टन कोठडीत शिरला आणि चार्ल्स दचकून उभा राहीला.

सिडने म्हणाला, “मी ल्युसीकडून एक विनवणी घेऊन आलो आहे. आता त्याचे स्पष्टीकरण देत बसायला वेळ नाही. फक्त तुमचे जाकीट, टाय व बूट काढा व माझे घाला. तुमच्या केसांची रिबीन मला द्या. आणि ती हलवून माझ्यासारखी सैल बांधा.” जेव्हा चार्ल्स काही न ऐकता, नुसता उभा राहीला, तेव्हा कार्टनने बदल करण्यासाठी त्याच्यावर जबरदस्ती करायला सुरवात केली.

चार्ल्स ओरडला, “कार्टन, हा वेडेपणा आहे. इथून कोणी निसटून जाऊ शकणार नाही. फक्त माझ्याबरोबर तू मात्र मरशील!”

कार्टनने आज्ञा दिली, “मी तुला पळून जायचा प्रयत्न करायला सांगितले नाही. फक्त इथे बसून, मी काय सांगतो, ते लिही.” त्याने चार्ल्सला खुर्चीत बसवले व त्याच्या हातात पेन दिले.

चार्ल्सने त्याचे घाबरलेले डोके हाताने दाबत, विचारले, “मी हे कुणाला उद्देशून लिहू?

“सिडने बोलला, “कुणालाच नाही. तो चार्ल्सच्या मागे उभा राहिला व हळूहळू त्याच्या शर्टात हात घातला. आता हे लिहीः तुला आपल्यात खूप वर्षांपूर्वी झालेले बोलणे आठवत असेल, तर तुला समजेल, की मी काय करतो आहे --- “

चार्ल्स म्हणाला, “मला खोलीत काहीतरी विचित्र वास येतो आहे.” त्याला शर्टातून सावकाश बाहेर येणारा सिडनेचा हात दिसत नव्हता.

सिडने शांतपणे बोलला, “मला कसला वास येत नाही. लिहित रहा. मी अनेक वर्षांपूर्वी बोललेले शब्द मला खरे करून दाखवायची संधी दिल्याबद्दल

आभारी आहे. ते असे होते --- *'मी माझे आयुष्यदेखील तुझ्यासाठी वेचेन. मी आता डोके पूर्णपणे शाबूत ठेऊन शांतपणे, ते करतो आहे आणि त्याबद्दल तुला दुःख वाटण्याचे वा पश्चात्ताप करण्याचे काही कारण नाही' --- "*

चार्ल्सचे डोळे गढूळले आणि हातातून पेन गळून पडले. त्याच वेळी सिडनेच्या हाताने केमिस्टकडून आणलेल्या द्रावणामध्ये भिजवलेले फडके चार्ल्सच्या नाकाभोवती गुंडाळले, तर दुसऱ्या हाताने त्याच्या छातीभोवती त्याला आवळून धरले. काही क्षण चार्ल्स झगडला मग ज्याने त्याचे आयुष्य त्याच्यासाठी अर्पण केले, त्याच्या पायाशी जमिनीवर बेशुद्ध होऊन पडला.

सिडनेने झटपट चार्ल्सचे कपडे घातले आणि त्याचे केस रिबिनीने मागे बांधले.

"सिडनेने हाक मारली, "पहारेकरी! आणि जॉन बर्साद खोलीत आला. "माझ्या पाहुण्याला बाहेर काढ. तो आजारी झाला आहे." मग कुजबुजत तो म्हणाला, "त्याला गाडीपर्यंत ने व आपल्या ठरलेल्या बेताप्रमाणे त्याला ताबडतोब मिस्टर लॉरींच्या ताब्यात दे. बर्साद, शेवटपर्यंत तुझा शब्द पाळ आणि मग माझे ओठ कायमचे मिटतील."

बर्सादने चार्ल्सला बाहेर काढले आणि कोठडीत सिडने एकटा राहीला. घड्याळाने तीनचे टोले दिले. एक पहारेकरी आत येऊन बोलला, "एव्हरमॉन्ड, माझ्या मागून ये. गिलोटिन तुझी वाट बघत आहे!"

# प्रकरण १७

# क्रांतीचा शेवट



Madame Defarge's Secret Plotting

त्या दुपारी तीनच्या थोडेसे आधी, पॅरीसमधून बाहेर जाणारी एक गाडी शहराच्या गेटशी थांबली.

पहारेकऱ्याने म्हटले, “तुमचे प्रवासाचे कागद द्या.”

ते गाडीच्या बाहेर काढून दाखवले गेले आणि पहारेकऱ्याने वाचले,

“अलेक्झांडर मॅनेट. डॉक्टर. फ्रेंच. तो कुठला उतारू आहे?”

जर्व्हीस लॉरीने एका गरीब, पुटपुटणाऱ्या माणसाकडे बोट दाखवत म्हटले, “ते हे आहेत.”

पहारेकरी बोलला, “नागरिक, डॉक्टर चांगल्या मनस्थितीत दिसत नाहीत.”

“क्रांतीचे वारे त्यांच्यासाठी फार बोचरे आहेत --- ल्युसी त्यांची मुलगी. फ्रेंच. मला वाटते, एव्हरमॉन्डची बायको?”

मिस्टर लॉरी उत्तरले, “हो.”

पहारेकरी फसव्या आवाजात हसत बोलला, “तोच एव्हरमॉन्ड ज्याला आज गिलोटीनने मारले जाणार आहे. मग ल्युसी आहे. तिची मुलगी आहे इंग्लिश --- आणि सिडने कार्टन. वकील. इंग्लिश. तो कुठे आहे?

गाडीच्या कोपऱ्यात अर्धवट बेशुद्धीत बसलेल्या सिडनेकडे निर्देश करत, मिस्टर लॉरी उत्तरले, “तो इथे आहे. तो आजारी आहे व आताच लोकशाहीमध्ये त्रासात असलेल्या एक मित्राला भेटून आला आहे.”


“आणि शेवटी बँकेत काम करणारा जर्व्हीस लॉरी. इंग्लिश.”

“मी जर्व्हीस लॉरी आहे --- नागरीका, आता आम्ही पॅरीस सोडू शकतो का?”

पहारेकरी म्हणाला, “हो, ही घ्या तुमची सही केलेली तयार कागदपत्रे. तुमचा प्रवास सुखाचा होवो!”

# प्रकरण १८

# गिलोटीनची फसवणूक



"This is a Far, Far Better Thing . . . ."

जेव्हा त्या चांगल्या दिवशी गिलोटीन त्याच्या बळींची वाट पहात होते, तेव्हा मॅडम दफार्ज जॅक्युस दोनला व तीनला भेटली. तिने वाइनच्या दुकानाऐवजी, तुरुंगाजवळ रहाणाऱ्या लाकूडतोड्या जॅक्युस दोनची झोपडी भेटण्यासाठी निवडली.

तिने त्यांना स्पष्ट केले, “माझा नवरा लोकशाहीचा चांगला सेवक असल्याने व शूर असल्याने, त्याला डॉक्टरांबद्दल वाईट वाटते. मी स्वतः डॉ मॅनेटची काही पर्वा करत नाही. तो जिवंत राहिला काय आणि मेला काय! पण एव्हरमॉन्ड कुटुंब मात्र नष्ट झाले पाहीजे. बायको आणि मुलीनेही नवऱ्याच्या व वडीलांच्या मागे गिलोटीनच्या मार्गाने जायला पाहीजे.”

माणसांनी कलकलाट करत, त्यांचे हात चोळत म्हटले, “ते किती छान दृष्य असेल!”

“पण माझ्या नवऱ्यावर माझा या बाबतीत विश्वास नाही. जर त्याला माझे बेत माहिती असतील, तर तो कदाचित त्यांना पळून जाण्यासाठी सावध करेल. लाकूडतोड्या नागरीका, मला तुझी मदत लागणार आहे. तू कोर्टात साक्ष देशील का, की कैदी एव्हरमॉन्डची पत्नी रस्त्यातून त्याला खाणाखुणा करत असे?”

“नक्कीच! मी तिला अनेक महिने दुपारी तिथे रस्त्यात कधीकधी तिच्या मुलीबरोबर आणि एकदा तिच्या वडिलांबरोबर उभे राहीलेले पाहिले आहे. नक्कीच ती कैद्याबरोबर लोकशाहीविरुद्ध काही बेत आखत होती.”

तिने ज्युरींच्या मंडळात असणाऱ्या, जॅक्युस तीनला विचारले, "ज्युरी ते ऐकून घेतील का? "

त्याने तिला खात्री दिली, "ज्युरींवर विश्वास ठेवा."

मॅडम दफार्ज पुढे बोलली, "माझा नवरा तसे म्हणाला, तरी मी त्या डॉक्टरला मोकळे सोडणार नाही. गिलोटीनला अजून डोकी गिळंकृत करायची इच्छा आहे. आज रात्री मला सेंट अँटोनीमध्ये भेट आणि आपण त्या सगळयांवर चिखलफेक करू. मध्यंतरीच्या काळात, मला एव्हरमॉन्डच्या पत्नीला तिच्या नवऱ्याच्या मरणासाठी शोक करतांना व लोकशाही विरुद्ध चिडलेले बघायचे आहे. त्यामुळे तिच्या विरुद्धच्या केसमध्ये चांगला पुरावा मिळेल. मी गिलोटीनसमोरील माझ्या नेहमीच्या खुर्चीत तुला भेटेन."

तिच्या ड्रेसमध्ये पिस्तुल लपवून, आणि कंबरपट्ट्यात चाकू लपवून, मॅडम दफार्ज झोपडीतून बाहेर पडली आणि मॅनेट यांच्या घराकडे निघाली.

मिस्टर लॉरी यांनी मिस प्रॉस आणि जेरी क्रंचरसाठी त्यांच्या मागून काही मिनिटांनी निघणाऱ्या वेगळ्या लहान गाडीची सोय केली होती. कारण पहिल्या गाडीतून फक्त पाच प्रवासी जाऊ शकत होते आणि त्यांची सुटका होणे जास्त महत्वाचे होते.

जेरी गाडी आणण्यासाठी बाहेर पडला होता आणि मिस प्रॉस घरातून बाहेर पडायच्या तयारीत होती. तेव्हा दार सताड उघडून, मॅडम दफार्ज एखाद्या वादळासारखी आत शिरली.

तिने मागणी केली, "एव्हरमॉन्डची पत्नी कुठे आहे?"

मिस प्रॉस ल्युसीच्या खोलीचे दार अडवून उभी राहिली, कारण तिला माहिती होते, की ती जितका जास्त वेळ त्या फ्रेन्च बाईला इथे ठेवेल, तितका जास्त वेळ तिच्या आवडत्या ल्युसीला इथून निसटण्या साठी मिळेल. मिस प्रॉस म्हणाली, “तू एक कठीण बाई आहेस.” “मी फार कठीण बाई आहे आणि तुझे दुष्ट बेत मी यशस्वी होऊन देणार नाही.”

दारे उघड्या असलेल्या तीन खोल्यांमध्ये मॅडम डोकावली. सगळ्या रिकाम्या होत्या. मग ती मिस प्रॉस वाट अडवून उभ्या असलेल्या दाराशी आली. तिच्या कंबरेला पकडले व तिच्या कंबरेच्या पट्ट्यात लपवलेल्या चाकूला हात घातला.

मिस प्रॉसला त्या शक्तिशाली बाईच्या मगरमिठीतून सुटणे अशक्य झाले. मॅडम दफार्जने तिच्या ब्लाऊजमधून पिस्तूल बाहेर काढले. पण ती इतकी चपळ नव्हती, कारण मिस प्रॉस त्यावर आपटली. तिथे एक प्रकाश पसरला व ठो असा आवाज होऊन, मिस प्रॉसने मॅडम दफार्जला तिच्या पायाशी जमिनीवर मरून पडलेले पाहीले! मिस प्रॉस व जेरी यांची गाडी पॅरीसबाहेर पडली तेव्हा बावन्न कैद्यांना लाकडी गाड्यांमधून गिलोटीनकडे आणण्यात आले. गर्दीतील कोणीतरी ओरडले, “तो बघा एव्हरमॉन्ड!”

इतरजण ओरडले, “उमराव मुर्दाबाद!

अनेक बायका विणताना हे सर्व बघत होत्या आणि गिलोटीनमधून उडालेली मुंडकी मोजत होत्या. त्यातील एका बाईने तिच्याजवळील रिकाम्या

खुर्चीकडे पाहीले. ती ओरडली, “थेरेस दफार्ज कुठे आहे? ती हे मृत्यूचे थैमान बघायचे कधीच टाळत नाही!”

सिडने कार्टनचा क्रमांक तेवीस होता. जशी त्याची लाकडी गाडी गिलोटीनपाशी आली, तसे त्याने त्याचे डोळे आकाशाकडे वळवले आणि कुजबुजला, “मी ज्यांच्यासाठी माझे आयुष्य अर्पण करतो आहे, ते माझे प्रिय मित्र मला दिसत आहेत. मी शांत, उपयुक्त व आनंदी आयुष्य जगलो. आता मी माझे आयुष्य प्रियजनांसाठी देतो आहे. त्यांच्या हृदयात मला विशेष असे स्थान मिळाल्याचे, मी पहातो आहे. ते माझी प्रेमाने आठवण काढत आहेत. असे माझ्या बाबतीत कुणीच पूर्वी केलेले नाही. मी माझ्या आयुष्यात आतापर्यंत केलेल्या गोष्टींपैकी ही सर्वात चांगली गोष्ट आहे. मला माहिती असलेल्या अमर विश्रांतीकडे, चिरनिद्रेकडे मी चाललो आहे. मला माहिती असलेल्या सर्व गोष्टींमध्ये ही सर्वात चांगली विश्रांती आहे --- “

अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे अठ्ठेचाळीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.


संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.

कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५


वृषाली जोशी यांची सत्तेचाळीस पुस्तके






























ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*

















ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*


























वृषाली जोशी
स्टीफन झ्वाइग
बुद्धिबळाची गोष्ट



वृषाली जोशी
The Death of
Ivan Ilych
इव्हान इलयीचचा मृत्यू



वृषाली जोशी
चार्ल्स डिकन्स



वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov



कत्तल करायची मेंढी
व इतर कथा
रोआल्ड डाल
वृषाली जोशी



वृषाली जोशी
मार्क ट्वेन



वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
लघुकथासंग्रह



वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
लघुकथासंग्रह



वृषाली जोशी
लिकॉकबरोबर हसा
स्टीफन लिकॉक



वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी



वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४



वृषाली जोशी
जॉन ओ'हारा
गुप्त सभा
व इतर कथा


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE


वृषाली जोशी
The SOUND OF MUSIC
संगीताचा नाद


THE SHAKESPEARE STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night






शेरलॉक होम्स


भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक


कराल ते पुस्तक उघडेल








## **ई साहित्य प्रतिष्ठानचे सोळा वर्षाचे होत आहे.**

## **डॉ. वृषाली जोशी यांचे हे अठ्ठेचाळीसावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची उंचावली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे. त्यांनी आजवर ई साहित्यच्या वाचकांसाठी केलेल्या जागतिक साहित्याच्या अनुवादांची **दहा हजाराहून अधिक पृष्ठे** प्रकाशित झाली आहेत व तो एक विक्रमच आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज

नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (५०), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४८), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१३), श्याम कुलकर्णी(१८), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) श्रीरंग कौलगी,

यशवंत कदम(६), पांडुरंग सूर्यवंशी(३) सुधीर कारखा्नीस, मिलिंद कपाळे मुकुंद कर्णिक (३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।